सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २६९ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# बालगंधर्व रंगमंदिर येथे ‘आठवण माईंची’ विशेष पुरवणीचे प्रकाशन

**पुणे :** अनाथांची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्मश्री डॉ. सौ. सिंधूताई (माई) सपकाळ यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे यशोदा माई राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात

## सिंधूताई सपकाळ यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली

आले होते. या प्रसंगी दैनिक सोलापूर तरुण भारततर्फे माईंच्या कार्याला आदरांजली म्हणून प्रकाशित करण्यात आलेल्या ‘आठवण माईंची’ या विशेष पुरवणीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

या प्रकाशन सोहळ्यास पद्मश्री गिरीश प्रभुणे, रेणुताई गावस्कर (अध्यक्षा – एकलव्य बाल शिक्षण व आरोग्य न्यास, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग), सेवा संकल्प प्रतिष्ठान (चिखली, जि. बुलढाणा), विलू पूनावाला फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी जसविंदर नारंग, अनंत चिंचोळकर, ममता सिंधूताई सपकाळ, दीपक दादा गायकवाड, विनय सिंधूताई सपकाळ, प्रणव सातभाई, सागर बोधगिरे तसेच दैनिक तरुण भारतचे धाराशिव जिल्हा प्रतिनिधी



अनिल आगलावे आदी मान्यवर उपस्थित होते.

‘आठवण माईंची’ या विशेष पुरवणीमधून सिंधूताई सपकाळ यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा, अनाथ, निराधार आणि वंचित मुलांसाठी केलेल्या कार्याचा तसेच समाजाला दिलेल्या मोलाच्या संदेशांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. माईंच्या कार्यातून प्रे–रणा घेऊन समाजात सेवाभाव आणि माणुसकी जपण्याचा संदेश ही पुरवणी देते.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी सिंधूताई सपकाळ यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांची आणि कार्याची आजच्या पिढीला अत्यंत गरज असल्याचे मत व्यक्त केले. पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास विविध सामाजिक संस्था, सेवाभावी कार्यकर्ते, पत्रकार तसेच माईंच्या कार्याने प्रेरित असलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सोहळा भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# पुण्यात ३२ कोटींचा प्रतिबंधित हुक्का साठा जप्त

**मुंबई :** पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील टाकवे येथील मे. सोएक्स इंडिया प्रा. ली. या कंपनीवर छापा टाकून अन्न व औषध प्रशासनाने तब्बल ३१ कोटी ६७ लाख २१ हजार ९८७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी कंपनीचे संचालक आणि व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई २ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आली. मुंबईतील अन्न विश्लेषकांच्या अहवालानुसार, या नमुन्यांमध्ये ’निकोटिन’ पॉझिटिव्ह आढळले. हे उत्पादन मानवी आरोग्यास घातक असल्याचे स्पष्ट झाले. एकूण किंमत ३१ कोटी ६७ लाख,२१,९८७ रुपये (३१.६७ कोटी) रुपयांचे विविध फ्लेवर्सचे तयार हुक्का प्रॉडक्ट्स, कच्चे पदार्थ आणि फ्लेवर्सचा साठा जप्त करून कंपनीच्या दारांना सील ठोकले आहे. अनिल कुमार चौहान, असिफ फाजलानी, फैजल फाजलानी, मे. सोएक्स इंडिया प्रा. ली. या व्यक्तींविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

विश्वास चिरंतन टिकणारा असतो




भारतीय आयुर्विमा महामंडळ सादर करत आहे
विशेष पुनर्जीवन अभियान
विलंब शुल्कात सवलतीसह
कालावधी: 1 जानेवारी, 2026 ते 2 मार्च, 2026

त्वरा करा!
ही संधी चुकवू नका.

आपल्या लॅप्स झालेल्या पॉलिसीचे विमा संरक्षण पुनर्जीवित करा आणि त्याचे लाभ मिळवत रहा*
*नियम व अटी लागू

| एकुण देय प्रिमियम | विलंब शुल्कातील % सवलत | जास्तीत जास्त सवलत उपलब्ध** |
|---|---|---|
| ₹ 1,00,000 पर्यंत | 30% | ₹ 3,000 |
| ₹ 1,00,001 ते ₹ 3,00,000 पर्यंत | 30% | ₹ 4,000 |
| ₹ 3,00,001 आणि अधिक | 30% | ₹ 5,000 |

** नियम व अटी लागू
योजनेच्या अटींनुसार, पहिला न भरलेला प्रीमियम देय झाल्याच्या तारखेपासून 5 वर्षांच्या आत पॉलिसी पुनर्जीवित करता येईल. संपर्कात रहा. आपला मोबाईल क्रमांक, ई–मेल, एनईएफटी आणि पॅनचे तपशील एलआयसीकडे अपडेट करा.
अधिक माहितीसाठी एजंटशी/जवळच्या एलआयसीच्या शाखेशी संपर्क साधा/www.licindia.in येथे भेट द्या किंवा तुमच्या शहराचे नाव 56767474 ह्या क्रमांकावर एसएमएस करा.

LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

आमचा वॉट्सअॅप नं. 8976862090 बोला ‘Hi’
एलआयसी मोबाईल अॅप डाऊनलोड करा LIC digital
भेट द्या: licindia.in
कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512
LIC/ P1/2025-26/30/Mar

भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत. अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसी धारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. **कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहिती पुस्तिका काळजी पूर्वक वाचा.**

# गौण खनिज वाहतुक करणाऱ्यावर कारवाई ; ११ कोटीचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ४ जानेवारी-**

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई करत ११ कोटी २ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत १९ हायवा जप्त करुन ३८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हि कारवाई दि.३ जानेवारी रोजी रात्री दहानंतर करण्यात आली.

असर्जन नाका ते भगतसिंघ चौकाकडे जाणाऱ्या मार्गावरुन मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची वाहतूक होत असल्याची माहिति मिळाल्यावरुन ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने रात्री दहानंतर या मार्गावर नाकाबंदी करुन तपासणी केली.यात १९ हायवा क्षमतेपेक्षा जास्त मुरुम भरुन वाहतूक करत असल्याचे आढळून आले. ग्रामीण पोलिसांनी या कारवाईत १९ हायवा जप्त केल्या असून, एकूण ११ कोटी २ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात पोहेकॉ. वसंत केंद्रे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हरिष राजू माने रा.कंळबेश्वर जि.अकोला,सय्यद फारुख बंदीसाब रा.मुत्याळ, गंगाधर नागनाथ सोनकांबळे, रा.पिंपळगाव ता.बिलोली, चंद्रशेखर बालाजी पाचंगे रा.अर्धापूर, कृष्णकुमार अंबिकाप्रसाद



रज्जक रा.करगील ता.जि.सिंधी मध्यप्रदेश, राजदिप देवराज कंबलिया रा.गुजरात, माणिक प्रभू निळकंठराव पाटील रा.टाकळी ता.बिलोली, अमितसिंह शिवमंगलसिंह रा.उमरगा उत्तर प्रदेश, प्रदीपसिंह श्रीजवाहरसिंह रा.कदवाड जि.सिंधी मध्यप्रदेश, धर्मपाल भिमराव वाघमारे रा.कुर्तडी ता.कळमनुरी, पंडित बाबराव टोणगे रा.लोहा, बळवंत गोरखनाथ कदम रा.कोंढा, ता.अर्धापूर, सुरेश उत्तम पवार रा.वरुड तांडा ता.कळमनुरी, माधव सोपान कागडे रा.कापशी बु., ता.लोहा, सतीश मधुकर पुयड रा.लाठ खुर्द, ता.कंधार, दिपूसिंग राममनोहर रा.ठराही उत्तर प्रदेश, विशाल मनोहर लांडगे, रा.लोंढे सांगवी ता.लोहा, हरिषसिंग दरोकसिंग ठाकूर रा.लालासोपारा, ता.वसई, सन्नीसिंह रामदेवसिंह रा.खेरडा जि.गिरीडोह झारखंड यांच्यासह अन्य हायवा मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिसांनी ११ कोटी २ लाख रुपयांच्या १९ हायवा, दहा ब्रास मुरुम, ९५ हजार असा एकूण ११ कोटी २ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, सहायक पोलीस निरीक्षक रेखा काळे, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे,पोहेकॉ. हरिष मांजरमकर, रामकिशन मोरे, नितीन मुसळे, विनोद पवार, जायभाये, मारोती भंगे, विष्णू कल्याणकर, संतोष पवार यांच्या पथकाने केली.



## सिडको प्रभाग क्रमांक २० मध्ये भाजपाने प्रचाराचा फोडला नाराळ

**नवीन नांदेड** -नांदेड महानगरपालिका निवडणुका २०२५ च्या रणधुमाळणीस भारतीय जनता पार्टीने दिनांक ४ जानेवारी रोजी वाघाळा येथून हनुमान मंदिर येथे प्रचाराचा नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रभागासह वाघाळा येथील मोठ्या संख्येने आजी-माजी पदाधिकारी , कार्यकर्त्यांची व मतदारांची उपस्थिती होती. सिडको भागातील प्रभाग क्रमांक २० मध्ये भारतीय जनता पार्टीच्या फायनल ने रविवार दिनांक ४ जानेवारी रोजी वाघाळा येथून प्रचाराचा नारळ फोडून मतदारांचा आशीर्वाद घेतला प्रभाग क्रमांक २० मधील भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार अनुसूचित जाती निरंजना राजू लांडगे, नामाप्र महिला मंगला गजानन देशमुख, नामाप्र वैजनाथ ईश्वरराव देशमुख, सर्वसाधारण महिला सुवर्ण सतीश बसवदे, सर्वसाधारण संजय शिवाजीराव घोगरे यांनी आपल्या प्रचाराचा नारळ फोडून प्रभागातील मतदारांचा आशीर्वाद घेत सिडको हडको, वाघाळा -आसदवण या परिसरात भारतीय जनता पार्टीचे कमळ फुलण्यासाठी मतदाराकडे आपल्या विकास कामाचे ध्येय पुढेठेवून आपल्या विकास कामाचा दर्जा टवून देत आहेत. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. अनिल सातारकर डॉ. नरेश रायवार, डॉ. ललिता बोकारे, संजय इंगेवाड, प्रमोद काळेवाड, गजानन काहाळेकर, सतीश बस्वदे, राजू लांडगे, वैजनाथ देशमुख यांच्यासह भाजपचे आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**बाऱ्हाळी** -येथील ऐकलव्य निवासी अंध विद्यालय येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापक रत्नाकर इखे प्रमुख पाहुणे म्हणून जाधव सुभाष गोविंदराव ,जाधव बि.एन.हे उपस्थित होते . याप्रसंगी प रत्नाकर इखे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी एम.जे.कोंडेवाड,बालाजी बारसोळे,एन.टि.अवधूते,कोतवाले डी. डी.,यांच्या सह शाळेतील कर्मचारी , विद्यार्थी उपस्थित होते.

## लिंबगाव पोलीसांची अवैध रेती वाहतुकीविरोधात कारवाई

**नांदेड**-अवैधरित्या रेतीची वाहतूक करणाऱ्या विरोधात लिंबगाव पोलिसांनी कारवाई करत ३५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हि कारवाई दि.४ जानेवारी रोजी करण्यात आली. लिंबगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळगाव कोरका येथील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या रेतीचे उत्खनन व वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन लिंबगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक पी.सी.बोधनकर व पथकाने पात्रालगत असलेल्या महादेव मंदिराजवळून टिप्पर क्र.एमएच-१४-बीजे-०८०३ व जेसीबी क्र.टिएस-०३-ईजे-६४३५ ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी ३५ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी माधव नानाराव बोकारे रा.राहाटी, शिवशंकर दौलत डुकरे रा.पिंपळगाव कोरका व शेख शादुल शेख हुसेन रा.पिंपळगाव कोरका या तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. हि कारवाई सहायक पोलीस निरीक्षक पंढरीनाथ बोधनकर, पोलीस उपनिरीक्षक एन.एम.सय्यद, पोहेकॉ. मोरे,देशमुख यांच्या पथकाने केली.

## स्वरा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटमध्ये ज्ञानज्योती सावित्री बाई फुले जयंती साजरी

**नायगाव** - घुंगराळा येथील स्वरा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या वतीने ज्ञानज्योती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून वंदन करण्यात आले.



समाजातील अज्ञान, विषमता व गुलामगिरी नष्ट करण्यासाठी शिक्षणाला प्रभावी शस्त्र बनवून बहुजन समाजाला जागृत करणाऱ्या क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य आजही समाजाला दिशा देणारे आहे. त्यांच्या या महान कार्याला अभिवादन करण्यासाठी स्वरा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. या जयंतीनिमित्त सायबर सिक्युरिटी विषयक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सध्याच्या डिजिटल युगात वाढत चाललेल्या सायबर गुन्ह्यांपासून महिलांनी कसे सावध रहावे, सुरक्षित ऑनलाईन वर्तन, फसवणुकीपासून संरक्षण याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे महिलांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागृती निर्माण झाली. या कार्यक्रमास गजानन वाघमारे (संचालक, स्वरा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट), वंचित बहुजन युवा आघाडी नांदेड (दक्षिण) जिल्हा उपाध्यक्ष, दीपक माधवराव गजभारे (घुंगराळेकर), आनंदा गारोळे, शिवकुमार हंगरगे, संजय पाटील बेलकर, मनोज बच्चेवार सावकार, मनोज मंडलापुरे, फोटोग्राफर राहुल वाघमारे, चैतन्य जाधव, प्रशांत जाधव, उमाकांत आवणुरे, केशव सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्वरा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपस्थितांनी सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षण, समानता व आत्मसन्मानाचा मार्ग अवलंबण्याचा संकल्प व्यक्त केला.

## प्रल्हाद कोटलवार यांचे निधन

**नांदेड** -सिडको येथील प्रल्हादराव विठ्ठलराव कोटलवार यांचे वयाच्या ८० व्या वर्षी आज दि. ४ जानेवारी रोजी निधन झाले. ते जिल्हा परिषद नांदेड येथे उपशिक्षणाधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झाले असून एकूण नांदेड जिल्ह्यात विविध पदावर ४० वर्ष कार्यरत होते. त्यांना ३ मुले राजेश कोटलवार पत्रकार ,मनोज कोटलवार शिक्षक आणि संजय कोटलवार व्यापारी हे आहेत.

## उमरी नगर परिषदेवर गोरठेकर राज; नगराध्यक्ष पदी शकुंतला मुदिराज

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ४ जानेवारी-**

उमरी नगर परिषदेवर गोरठेकर यांची चौथ्यांदा सत्ता आल्यावर त्या सत्तेतील १५ वर्ष नगरसेवक राहीलेल्या सौ. शंकुतला भगवान मुदिराज यांना थेट नगराध्यक्ष पदासाठी निवडून दिल्याने दि २ जानेवारी २०२६ रोजी त्यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्विकारला आहे पण उपनगराध्यक्ष पदासाठी गोरठेकर घराण्यातील तिसरी पिडीचे नेते कैलास देशमुख गोरठेकर हे असणार असल्याची चर्चा होत आहे .

उमरी नगराध्यक्ष पद हे अनुसुचित जमाती महिलासाठी राखीव होते. कै . माजी आमदार बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या निधनानंतर ही निवडणूक गोरठेकर घराण्याची प्रतिष्टेची ठरली होती. मतदार जनतेनी बहुमताने गोरठेकर घराणे यांच्यावर विश्वास ठेवून २० पैकी १८ नगरसेवक थेट नगराध्यक्ष यांना भरघोष मताने निवडून दिले पुन्हा चौथ्यांदा गोरठेकर बंधूची राजकीय जादू विरोध्कानां भारी पडली आहे . राजकीय डायरेक्टर माजी नगराध्यक्ष प्रविण सारडा , कैलास देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शिरीष देशमुख गोरठेकर , सुभाष देशमुख गोरठेकर (नाना ) यांना श्रेय जात आहे .

या राष्ट्रवादी अजीतदादा पवार गटातून



निवडून आलेले नगरसेवक गोरठेकर यांचे समर्थक व छावा संघटनेचे प्रसिद्ध नेते राजेश जाधव यांची नगरपरिषद गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे .

यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये कैलास देशमुख गोरठेकर, माजी नगराध्यक्ष प्रविणभाऊ सारडा, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी सदानंद खांडरे, नगरसेवक संदीप चंदनवार, सुनंदा झडते, रतन खंदारे, नगमा बेगम, वसीम खुरेशी, साईनाथ जमदाडे, अनुराधा खांडरे, अनुसयाबाई कटकदवणे, गजानन अलसटवार, प्रिती रणनवरे, विष्णू पंडित, सुमनबाई रैपनवाड, रुक्मिणीबाई खांडरे, राजेश जाधव, लक्ष्मीबाई शिंदे, निकीता सिंगरवाड (पंतोजी), बाबू बेंग, हुसेन बेग, मीराबाई शेळके यांच्यासह नगरसेवक कर्मचारी गणेश मदने, सचिन गंगासागरे, बालाजी यमलवाड, नागेश बट्टेवाड ,गजानन लकडेवाड, विनोद सावंत, शकील पठाण, गंगाधर पवार, सुरेश माळवतकर, सह प्रतिनिधी, कार्यकर्ते व नगरपरिषदे चे कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'हलके मे मत लेना'
## आ. कल्याणकर महायुतीला देणार चांगलेच उत्तर !

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ जानेवारी-**

नांदेड दक्षिण मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना शिंदे गटाने युती केली आहे तर दुसरीकडे उत्तर मतदारसंघात मात्र आमदार बालाजी कल्याणकर स्वबळावर लढणार असल्याने जनता संभ्रमात पडली असली तरी बालाजी कल्याणकर मात्र या मनपा निवडणुकीच्या माध्यमातून महायुतीतल्या स्वपक्षासह मित्र पक्षांना चांगलेच उत्तर देणार असल्याची चर्चा नांदेड शहरात सुरू आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणुकीदरम्यान निर्णय घेण्याचे अधिकार स्थानिक आमदारांना दिले आहेत. या अनुषंगाने बालाजी कल्याणकर यांनी उत्तर मतदारसंघातील परिस्थिती पाहता तसेच या ठिकाणी झालेले विकास कामे पाहता उत्तर मतदारसंघात महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान हा निर्णय घेण्यापूर्वी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते.



त्यांची पत्रकार परिषद झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना शिंदे गटाने पत्रकार परीषद घेत नांदेड दक्षिण मतदार संघात युती झाल्याचे जाहीर केले. योवळी आमदार हेमंत पाटील, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार आनंद बोंढारकर यांची उपस्थिती होती. दक्षिण मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस १७ तर शिवसेना १६ अशा जागा लढवणार असल्याचे सांगण्यात आले. एका मतदारसंघात युती आणि एक मतदार संघ स्वबळावर या निर्णयामुळे नांदेड शहरातील जनता संभ्रमात पडली आहे. त्यातच एखादवेळी मोठ्या नेत्यांच्या सभा घ्यायच्या कुठे किंवा उमेदवारांचा प्रचार करायचा कसा असा प्रश्न पडलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार स्थानिक पातळीवर असला तरी हा निर्णय अनेकांच्या पचनी पडला नाही. त्यातच नांदेड मनपा निवडणुकीत लढाई केवळ महायुतीमध्येच दिसून येत आहे. काँग्रेस किंवा अन्य पक्षांना महायुतीने गृहीत धरले नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महायुतीच्या या भांडणात तिसराच जिंकेल की काय अशी ही स्थिती निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे स्वबळावर निवडणूक लढवणाऱ्या आमदार बालाजी बालाजी कल्याणकर यांनी 'हलके मे मत लेना' म्हणत चांगलीच तयारी सुरू केली असून स्वपक्षासह महायुतीतील मित्र पक्षांना चांगले उत्तर देण्याचा संकल्प त्यांनी केला असल्याची चर्चा उत्तर मतदार संघात सुरू आहे. त्यामुळे निवडणुकीच्या निकालात आमदार बालाजी कल्याणकर हे महायुतीतील स्वपक्षासह मित्र पक्षांना चांगलेच उत्तर देतील काय याकडेही अनेकांचे लक्ष लागले आहे.

# रस्त्यावरील धुळीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि. ४ जानेवारी-**

तालुक्यातील कोळी परिसरातील बामणी फाटा ते तळणी रस्त्याच्या काम अनेक दिवसापासून चालू आहे. वाहनांच्या वाढत्या वर्दळीमुळे उडणाऱ्या धुळीचा मोठा फटका या रोड लगतच्या शेतीला बसत आहे. रस्त्यावर नियमित पाणी न टाकल्याने पिकांवर धुळीचे थर साचले असून, उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून रस्त्यावरून जाणाऱ्या अवजड वाहनांमुळे धुळीचे लोट उसळत आहेत. ही धूळ लगतच्या शेतातील कपाशी, हळद , सोयाबीन, भाजीपाला आणि फळबागांवर साचत आहे. पानांवर



धूळ साचल्यामुळे झाडांची प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया मंदावली असून, पिके पिवळी पडू लागली आहेत. यामुळे पिकांची वाढ खुंटली आहे.

**शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान**

रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने किंवा संबंधित विभागाने रस्त्यावर दिवसातून दोन-तीन वेळा पाणी टाकणे अपेक्षित आहे. मात्र, याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. पिकांवर औषध फवारणी करूनही धुळीमुळे त्याचा उपयोग होत नाही, आमचा खर्च वाया जात आहे, अशी व्यथा स्थानिक शेतकऱ्यांनी मांडली आहे.

धुळीमुळे केवळ पिकांचेच नाही, तर रस्ते कडेला राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन रस्त्यावर पाणी फवारणी सुरू करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

**अपघातात वाढ**

सदरील रोडचे काम अनेक दिवसापासून चालू असून रोड वरील वाहतुकीमुळे जो धूर मागून उडत आहे. त्या धुरामुळे पाठीमागे असलेल्या गाडीच्या चालकाच्या डोळ्यात जात आहे तसेच त्याला पुढचे काही दिसत नसल्यामुळे अपघाताचा धोका वाढत आहे. तसेच चालकाला गाडी चालविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ४ जानेवारी-**

नांदेड भोकर महामार्गावरील मौजे बामनवाडी फाट्याजवळ दि.०३ जानेवारी रोजी रात्री ११:३० वाजेच्या दरम्यान वन्यप्राणी बिबट (नर)यास अज्ञात वाहनाने धडक दिल्याने बिबट जागीच मृत्यूमूखी पडल्याची घटना घडली असून हि घटना कळताच उपवनसंरक्षक नांदेड केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे भारत खेलबाडे सहाय्यक वनसंरक्षक(तेंदू कॅम्पा)अनिल रासने वनपरिक्षेत्र अधिकारी नांदेड अंगद खटाने वनपरिक्षेत्र अधिकारी भोकर वनपरिमंडळ अधिकारी अंबादास बेदरकर ज्ञानेश्वर धोंडगे ज्ञानेश्वर हकदळे वनरक्षक सूरेश खलसे सूभाष पिल्लाजी संतोष भोंग हनमंत धूळगंडे



नितीन चव्हाण विजय बंडगर गोविंद जाधव लक्ष्मण शेळके वनमजूर वरिल घटनास्थळी तात्काळ दाखल होवून घटनास्थळाची चौकशी करुन मृत बिबट्याचे शवविच्छेदन व दहन करण्यासाठी वन्यप्राणी उपचार केंद्र नारवट येथे आणून दि.०४ जानेवारी रोजी पशूधन विकास अधिकारी डॉ.अविनाश बून्नावार डॉ.विजय चव्हाण डॉ.दिक्षाली मोरे यांचेसह पूर्ण टिम पाचारण करुन शवविच्छेदन करुन अग्निदहन करण्यात आले पूढिल तपास सूरु आहे.

# भोकरचे नवनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवक यांचा सत्कार

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ४ जानेवारी-**

भोकर नगरपालिकेचे नवनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवकांचा दि.०३ रोजी चिखलवाडी येथील विठ्ठल मंदिर परिसरात भाजपाचे सूनिल शहा यांचेकडून सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे तसेच नगरसेवक युसूफ शेख,संजय घंटलवार,विठ्ठल पाटील धोंडगे, राजेश्वर कदम, गणेश बोलेवार, सिद्धेश्वर पिटलेवाड, साईप्रसाद जटालवार, डॉ मनोज गिमेकर, पंकज पोकलवार, गोटू क्षीरसागर, सुहास पवार, डॉ.फेरोज इनामदार, दिनेश लक्षटवार, सना इनामदार, नाजीम शेख, गंगाधर पवार, डॉ बालाजी अंदबोरीकर, अविनाश वाघमारे, गौतम कसबे, योगेश देशपांडे, गणेश यशवंतकर यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला पदभार स्वीकारल्यानंतर नागरिकांच्या अपेक्षा, व परिसरातील समस्या प्रभावीपणे सोडवाव्यात अशी मागणी करण्यात आली तसेच मारुती मंदिरात अकरा नारळ फोडून, आरती करून सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास चिखलवाडीतील मित्रमंडळीची प्रमूख उपस्थिती होती. काही नगरसेवक अपरिहार्य कारणांमुळे उपस्थित राहू शकले नाहीत त्यांचाही सत्कार लवकरच करणार असल्याचे सूनिल शाह यांनी सांगीतले. या प्रसंगी काही नगरसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले व सर्वांनी एकमुखाने जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही,आपल्या प्रभागात प्रामाणिक पणे कार्य करू अशी हमी दिली.या कार्यक्रमास परिसरातील प्रतिष्ठित नागरीक यूवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिग्गजांसह नवखे चेहरे हदगाव पालिका सभागृह गाजविण्यास सज्ज

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ४ जानेवारी-**

नुकत्याच पार पडलेल्या हदगाव नगरपरिषद सार्वत्रिक २०२५ च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हदगाव शहरातील सुजाण मतदारांनी कोणत्याच पक्षाला निम्म्या पेक्षा अधिक जागा पर्यंत पोहोचू न दिल्याने यंदा निवडून आलेल्या काही दिग्गज चेहऱ्यांमध्ये नवखे चेहरे पण हदगाव नगरपरिषद मध्ये आप-आपल्या प्रभागात मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून घेण्याकरिता सभागृह गाजविण्यासाठी सज्ज राहणार असल्याचे एकंदरीत चित्र आता स्पष्ट होऊ लागले आहे.

हदगाव नगरपरिषद च्या निवडणुकीनंतर सर्वात मोठा पक्ष म्हणून युतीकडे पाहिले जाते असून त्यांच्याकडे शिवसेना (शिंदे गट) भाजपाची युती होऊन या ठिकाणी अनुक्रमे शिवसेना ५ तर भाजपाचे ३ नगरसेवक निवडून आले असून त्यांची संख्याबळ एकूण ८ झाली त्या खालोखाल शिवसेना (उबाठा गटाचे) ७ नगरसेवक निवडून आलेत काँग्रेस पक्षाने ५ नगरसेवक संख्या पर्यंत मजल मरता आली. या सर्व संख्याबळावर पुढील डावपेच, उपाध्यक्षांची नियुक्ती, सभापती पदाच्या नियुक्ती याची खरी कसोटी होणार असून या सर्व नियुक्त्या मोठ्या राजकीय समीकरणाची नांदी ठरविणार असल्याचे बोलले जात आहे. निवडून आलेल्यांपैकी काही दिग्गज चेहरे आहेत ज्यांना सभागृहाचा पूर्वपार अनुभव राहिलेला आहे तर त्यांच्यासमोर काही नवखे चेहरे देखील सभागृहात पोहोचले असून त्यांच्यासमोर यांचे तगडे आव्हान राहणार असून याची परतफेड करण्याकरिता वरिष्ठांकडून मार्गदर्शन घेण्याची नितांत गरज भासणार असल्याचे राजकीय तज्ञांकडून बोलले जात आहेत.

# कंधार दर्गाह मौलवी साहेब किबला यांच्या २०५ व्या उर्साची तयारी अंतिम टप्प्यात

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. ४ जानेवारी-**

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात स्थित प्राचीन दखखन प्रदेशातील केंद्रीय खानकाह अर्थात आध्यात्मिक विद्यापीठाचे संस्थापक, थोर सूफी संत हजरत शेखुल अरब व अजम, उस्तादुल मुहद्दिसीन हजरत शाह मुहम्मद रफिउद्दीन फारुकी मुहद्दिस कंधारी (प्रसिद्ध मौलवी साहेब किबला) रहमतुल्लाह अलैह यांच्या २०५ व्या वार्षिक उर्स शरीफच्या कार्यक्रमांची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

या उर्साच्या पार्श्वभूमीवर दर्गाह शरीफचे सध्याचे साज्जादा गद्दीनशीन व मुतवल्ली हजरत कारी शाह मुहम्मद ताजुद्दीन उमर पाशा साहेब किबला यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व व्यवस्था काटेकोरपणे करण्यात येत आहे. दर्गाह शरीफच्या सुमारे २०० वर्षे



जुन्या ऐतिहासिक इमारतीची दुरुस्ती, रंगकाम व सुशोभीकरणाचे काम अंतिम टप्प्यात असून परिसर आकर्षक स्वरूपात सजविण्यात येत आहे. तीन दिवस चालणाऱ्या या उर्स कार्यक्रमात धार्मिक, आध्यात्मिक, प्रशिक्षणात्मक व सुधारक सभा, महफिल-ए-समा, महफिल-ए-मिलाद शरीफ यांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच उर्सासाठी येणाऱ्या भाविक व यात्रेकरूंकरिता लंगर-ए-नियाज शरीफ, निवास व्यवस्था व इतर मूलभूत सोयी-सुविधांची शांत व सुव्यवस्थित पद्धतीने व्यवस्था करण्यात आली आहे. हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे. यावर्षीचा २०५ वा उर्स शरीफ दिनांक ५, ६ व ७ जानेवारी २०२६ रोजी पारंपरिक पद्धतीने मोठ्या भक्तिभावात संपन्न होणार असून देश-विदेशातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या उर्स कार्यक्रमांचा प्रारंभ यापूर्वी दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी हजरत मुहद्दिस कंधारी रहमतुल्लाह अलैह यांच्या २८३ व्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यान सभा, महफिल-ए-रातिबुल हद्दाद, जिक्र व नियाज लंगर शरीफ यांच्या माध्यमातून करण्यात आला होता. सदर माहिती साज्जादा नशीन साहेब किबला यांच्या वतीने मोहम्मद अलिमोद्दीन फारोकी रिफाई कादरी यांनी सांगितले.

CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २६९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सिटी प्रेस क्लब चाकूरचे पत्रकारिता पुरस्कार जाहीर



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ४ जानेवारी :** सिटी प्रेस क्लब चाकूरच्यावतीने पत्रकारिता क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या पत्रकारांसाठी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा दि.०२ जानेवारी रोजी पत्रकार परिषदेत करण्यात आली असून उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार संपादक संजय जेवरीकर,पत्रकार भूषण पुरस्कार काशीबाई थोरात,मायदादा वृतरत्न पुरस्कार अभय मिरजकर आणि चाकूर भूषण पत्रकारिता पुरस्कार नागनाथ पाटील यांना देण्यात येणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे. सदरील पुरस्कारांचे वितरण सोमवार १२ जानेवारी २०२६ रोजी एका भव्य कार्यक्रमात राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते व अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाच्या सभागृहात वितरण केले जाणार असल्याची माहिती सिटी प्रेस क्लब चाकूरचे अध्यक्ष प्रा.अ. ना. शिंदे व सचिव मधुकर कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

**जेष्ठ पत्रकार संजय जेवरीकर,काशीबाई थोरात,अभय मिरजकर आणि नागनाथ पाटील यंदाच्या पुरस्काराचे मानकरी**

यावर्षीच्या पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ पत्रकार संजय जेवरीकर, वरिष्ठ सहाय्यक संचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई काशीबाई थोरात,दैनिक सामनाचे जिल्हा प्रतिनिधी अभय मिरजकर आणि नागनाथ पाटील हे आहेत. स्व.नागोराव संभाजी शिंदे यांच्या स्मरणार्थ पत्रकार अ. ना.शिंदे यांच्यावतीने 'मराठवाडा स्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' जेष्ठ पत्रकार संजय जेवरीकर यांना दिला जाणार आहे.कालवश मालनबाई सोपानराव कांबळे व कालवश सोपान काशीराम कांबळे यांच्या स्मरणार्थ पत्रकार मधुकर कांबळे यांच्या वतीने 'मराठवाडा स्तरीय मायदादा वृत्तरत्न पुरस्कार' दैनिक सामनाचे जिल्हा प्रतिनिधी अभय मिरजकर,स्व.काशीबाई बळीराम सोनटक्के यांच्या स्मरणार्थ जेष्ठ स्वातंत्र सैनिक बळीरामजी सोनटक्के व पत्रकार संगमेश्र्वर जनगावे यांच्या वतीने 'मराठवाडा स्तरीय पत्रकार भूषण पुरस्कार' वरिष्ठ सहाय्यक संचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई काशीबाई थोरात यांना तर चाकूर येथील जेष्ठ पत्रकार नागनाथ पाटील यांना 'चाकूर भूषण पत्रकारिता पुरस्कार' दिला जाणार आहे.

# जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत निलंग्याचा राठोड पहिला

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. ४ जानेवारी :** शिक्षकांचे आरोग्य तंदुरुस्त राहवे. यासाठी शिक्षक पतसंस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त लातूर जिल्ह्यातील इ. १ ते १२ पर्यंतच्या जिल्हा परिषद शाळा, खाजगी शाळा, माध्यमिक शाळा, आश्रम शाळा, अनुदानित शाळा, विनाअनुदानित शाळा, स्वयं अर्थ सहाय्य शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यासाठी औसा येथे रविवार दि. ४ रोजी सकाळी ७ वा. मरेथान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये ३१२ शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. तर या स्पर्थेत निलंगा तालुक्यातील केळगाव येथील माध्यमिक आश्रम शाळेतील बालाजी राठोडने पाच किलोमीटरचे अंतर २२मि. ५सेकंदात पुर्ण करुन विजेतेपद पटकावले.

या मॅरेथॉन स्पर्धा सुरु होण्यापुर्वी आदित्य आळंगे यांच्या झुम्मा डान्सवर आ.अभिमन्यू पवार यांच्या सोबत सर्व



स्पर्धकांनी अर्धा तास आनंद घेतला. त्यानंतर सकाळी ७ वाजता उत्साहपूर्ण वातावरणात मॅरेथॉन स्पर्धा सुरु झाली. ५ कि.मी. मॅरेथॉन स्पर्धेचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करण्यात आले. औसा शहरातील मुक्तेश्र्वर मंदिर ते उंबडगा रोड वरील गणपती मंदिर व परत मुक्तेश्र्वर मंदिर या प्रमुख मार्गांवरून मॅरेथॉन स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेत निलंगा तालुक्यातील केळगाव येथील माध्यमिक आश्रम शाळे-तील बालाजी राम राठोड यांनी अवघ्या २२ मिनिट ५ सेकंदात पूर्ण करून प्रथम क्रमांक मिळवला तर निलंगा तालुक्यातील हाडागा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे चंद्रकांत कमलाकर पाटील यांनी २२ मिनिटे ३८ सेकंदात पूर्ण करून द्वितीय क्रमांक मिळवला तर चाकुर तालुक्यातील महालंग्रा येथील डी, बी. पब्लिक स्कुलचे फिरोज मुलतानी पटेल यांनी २३ मिनिटात अंतर पूर्ण करून तृतीय क्रमांक मिळवला. या विजेत्या धावपटूंना आ.अभिमन्यू पवार, किल्लारी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोपाळ शिंदे, पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे यांच्या हस्ते प्रथम क्रमांक विजेत्याला ५००१ रु., द्वितीय क्रमांक विजेत्याला ३००१ रु., तृतीय क्रमांक विजेत्याला २००१ रु., व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेतील सर्व सहभागी स्पर्धकांना व तालुक्यातील उपस्थित पत्रकारांना टी शर्ट देण्यात आले आणि सर्व सहभागी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते मेडल देण्यात आले.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, राज्यात औसा मतदार संघात प्रथमच शिक्षकांच्या स्पर्धा घेतल्याबद्दल औसा शिक्षक पतसंस्थेचे कौतुक करून शिक्षकांनी आज विद्यार्थी होऊन शिस्त, संयम, नियोजनबद्ध स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविल्याबद्दल मला अभिमान वाटला असल्याचे मत व्यक्त केले. चेअरमन महादेव खिचडे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

चेअरमन महादेव खिचडे, व्हा. चेअरमन हरीश आयतनबोने, सचिव संजय जगताप, मॅरेथॉन स्पर्धा प्रमुख संजय रोडगे, संचालक युसुफ पिरजादे, मधुकर गोरे, रमेश जाधव, महेश कांबळे, दिपक डोंगरे, धीरजकुमार रुकमे, अमोल शेळके, कर्मचारी वर्ग, मॅरेथॉन स्पर्धा समितीचे सदस्य, स्वयंसेवक तसेच स्थानिक प्रशासनातील पोलीस स्टेशन औसा, आरोग्य विभाग औसा, ज्ञान पंढरी मॉर्निंग ग्रुप, शिवनेरी मॉर्निंग ग्रुप यांनी स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# धुमाळ यांचा शिवसेनेतील प्रवेश विधानसभेला उभारी देणारा : माने

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ४ जानेवारी :** जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांचा शिवसेनेतील प्रवेश निलंगा विधानसभेला उभारी देणारा असल्याचे मत शिवसेना जिल्हा प्रमुख शिवाजीराव माने यांनी व्यक्त केले. नुकतेच शिवसे-नेत प्रवेश केलेल्या पंडितराव धुमाळ व त्यांच्या सहकाऱ्यांचा भव्य सत्कार निलंगा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी माने बोलत होते.

आगामी काळात अनेकांचे शिव-सेनेत जाहीर प्रवेश होणार असून निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात इतर पक्षांची असंख्य कार्यकर्ते शिवसेनेमध्ये येण्यासाठी इच्छुक आहेत. भविष्यात अनेकांचे प्रवेश होणार असून एकनाथ



शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून कर्तृत्वाचा उमटलेला ठसा हा प्रेरणादायी आहे. निलंगा विधानसभा हा एक शिव-सेनेचा मजबूत किल्ला बनवण्यासाठी प्रवेश केलेल्या सर्व लोकांनी तसेच शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये स्वतः ला झोकून देऊन काम करावे. तसेच होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार युतीच्याबाबत निर्णय घेतला जाईल. या आदेशाप्रमाणे निवडणुका लढवल्या जातील. परंतु निलंगा, देवणी व शिरूर अनंतपाळ या तिन्ही तालुक्यांमध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती साठी शिवसेनेने ताकदीने उभे राहावे असे आवाहनही जिल्हाप्रमुख माने यांनी केले.

यावेळी पंडितराव धुमाळ, संजय बिरादार,उल्हास सूर्यवंशी, महेश चव्हाण आदींचा शिवसेनेत प्रवेश केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देतांना पंडितराव धुमाळ म्हणा-ले की, होय मी निश्र्चित एक चांगलं व्यासपीठ ,एक चांगला नेता ज्या नेतृत्वात मला काम करण्याची इच्छा होतेती असं नेतृत्व मला एकनाथ शिंदे यांच्या रूपाने दिसले म्हणून मी शिवसेनेत प्रवेश केला. भविष्यात संपूर्ण जीवन शिवसेनेच्या सोबतच घालविन . माझ्यासोबत आलेले सर्व सहकारी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांच्या आदेशाचे पालन करून शिवसेना पक्ष वाढीसाठी निश्चित प्रयत्न करू.



## रोखठोक

दिनेश गुणे

# काळाच्या प्रवाहातील सांडपाणी

'महाराष्ट्रात सांगलीशेजारच्या पेठ गावाजवळ एका खाजगी कारखान्याचे शौचकूप स्वच्छ करताना तीन कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला. अन्य पाच कामगार दूषित हवेमुळे अत्यवस्थ असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत!'

उभे जग नव्या वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज होत असताना, मावळत्या वर्षातील डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यातील अखेरच्या रविवारी ही दुर्दैवी घटना घडली आणि हाताने मैला साफ करण्याच्या अमानवी प्रथेचे समूळ उच्चाटन करण्याच्या आणाभाकांची आठवण नव्याने जागी झाली. याआधी केंद्र सरकारने, राज्य सरकारांनी आणि न्यायालयांनीदेखील या अमानवी प्रथेच्या उच्चाटनाचे आदेश, सूचना, मार्गदर्शक तत्त्वे आणि कायदेही जारी केले होते. पण सामाजिक न्यायाच्या संकल्पनेस हरताळ फासणारी ही कुप्रथा अजूनही बंद झालेली नाहीच, उलट वर्षागणिक अशाच दुर्दैवी घटनांमध्ये होणाऱ्या मृत्यूंच्या बातम्यांनी माध्यमांचे रकाने मात्र अव्याहतपणे वाहताना दिसतात... तीन साडेतीन वर्षांपूर्वी, मार्च २०२२ मध्ये मुंबईच्या चारकोप भागात सार्वजनिक शौचालयाची टाकी साफ करताना चार जणांचा गुदमरून मृत्यू झाला होता, तर चार वर्षांपूर्वी चंद्रपूर जिल्ह्यात बल्लारपूर परिसरात सांडपाण्याची भूमिगत टाकी स्वच्छ करताना तीन कंत्राटी मजूर घुसमटून दगावले. सुमारे दोन वर्षांपूर्वी परभणीत सेफ्टी टँक साफ करताना पाच कामगार दगावले, तर बरोबर एक वर्षापूर्वी, ३ जानेवारी २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील उरणजवळील एका गावात स्वच्छतागृहाची टाकी साफ करणाऱ्या दोन मजुरांचा विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू झाला. कायदे, नियम आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पना धुडकावून ही कुप्रथा आजही सर्वत्र सुरू आहे, हा या घटनांचा अर्थ आहे!

समाजाच्या कोणत्याही घटकास अपमानकारक, अमानवी ठरणारी कोणतीही प्रथा काळाच्या प्रवाहासोबत नष्ट व्हावी हे प्रगत समाजव्यवस्थेचे लक्षण असते. भारतातील बहुसंख्यांच्या समाजाने तसे करून दाखविले आहे. गैरसमजुतीमुळे किंवा केवळ प्रथांमुळे पडलेल्या अनेक रूढी, परंपरा काळासोबत मागे पडल्या. आता जग जवळ आलेले असताना व प्रगतीची पावले वेगाने पडत असताना त्यापैकी अनेक अनावश्यक प्रथा तर समाजाच्या स्मरणातूनही पुसल्या गेल्या आहेत. तरीही काही प्रथा अधूनमधून आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत असतात. हाताने मैला साफ करण्याची प्रथा हा देशाच्या समाजव्यवस्थेचा कलंक अजूनही अस्तित्वात असल्याचे दिसते, तेव्हा, वेगवेगळ्या क्षेत्रांत घोडदौड करणारी प्रगतीची आणि नवतंत्रज्ञानांची पावले या प्रथेबाबत मात्र पेंड का खातात असा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न जुनाच आहे. तरीही, प्रत्येक वेळी जेव्हा तो नव्याने समोर येतो, त्याची गंभीर चर्चा होते, या प्रथेविषयी चीड व्यक्त केली जाते, मानवाधिकाराच्या मुद्यांचा खल होतो, अगदी न्यायालयांपासून संसदेपर्यंत आणि राज्य सरकारांपासून सामाजिक संघटनांपर्यंत सर्व मंचांवर या प्रथेच्या संपूर्ण निर्मूलनाची गरज व्यक्त होते, आणाभाका घेतल्या जातात, तरीही ही प्रथा समूळ नष्ट झालेली नाही याचे अनेक दाखले या कुप्रथेमुळे जागोजागी घडणाऱ्या जीवघेण्या घटनांमधून उघड होत असतात. मानवी विष्ठा किंवा मैला किंवा मलद्रव्यांची सफाई करण्यासाठी मानवी हातांना पर्याय का सापडत नसावा, असा प्रश्न वारंवार विचारला जातो. आता सफाई करणारी यंत्रे उपलब्ध आहेत, कृत्रिम बुद्धिमत्तेसारखे तेजस्वी दुधारी हत्यार मानवाच्या हाती सापडले आहे आणि समाजसुधारणेचे आणि विकासाचे संकल्प सोडून त्याची प्रामाणिक अंमलबजावणी करण्याची उमेद असलेले नेतृत्वदेखील आहे, तरीही मानवी हाताने सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि शौचालये स्वच्छ करण्याची प्रथा देशातून पूर्णपणे हद्दपार झाल्याचा छातीठोक दावा करण्यास अजूनही कोणतीच यंत्रणा धजावत नाही, ही भारताच्या अमृतकाळातील एक लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल. या प्रथेविरुद्ध संसदेत आवाज उमटले, अनेक सरकारांनी या प्रथेचे उच्चाटन करण्याची आश्वासने दिली, कित्येक दशकांपासून संसदेसारख्या अत्युच्च सभागृहात या प्रथेच्या संदर्भात प्रश्नोत्तरे, चर्चा, विधेयके, कायदे यांबाबत ऊहापोहदेखील झाला, तरीही या प्रथेची पाळेमुळे अजूनही पुरती नष्ट झालेली नाहीत. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात मार्च २०२४ मध्ये मंत्रिमंडळाच्या एका बैठकीतही या प्रथेविषयी गंभीर चर्चा झाली. हाताने मैला उचलण्याच्या प्रथेचे समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार राज्य सरकारने एका निर्णयाद्वारे जाहीर केला. यंत्रमानवाच्या साह्याने हे काम करण्याची योजनादेखील जाहीर झाली, तिचा भरपूर गाजावाजाही झाला. याआधीही अनेकदा सरकारी स्तरावर या प्रथेविरोधात चर्चा झडल्या असतील, निर्णयही झाले असतील, न्यायालयांनीही सरकारचे कान उपटले असतील, मात्र त्याचे काय झाले आणि यांत्रिक सफाईच्या त्या निर्णयाच्या अंमलबजावणीविषयी कोणती कार्यवाही झाली, हे अजूनही पुरते स्पष्ट झालेले नाही.

राज्य सरकारने त्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, हाताने मैला साफ करण्याच्या या प्रथेचे उच्चाटन करण्याकरिता रोबोटिक स्वच्छता यंत्रे आणि यांत्रिक उपकरणांचा वापर तसेच स्वच्छता युनिट वाहने खरेदी करण्याचे जाहीर झाले होते. राज्यातील अ आणि ब वर्ग नगरपरिषदांमध्ये पहिल्या टप्प्यात ही मोहीम राबविली जावी आणि या नगर परिषदांतील अंमलबजावणीनंतर निधी उपलब्ध राहिला, तर क वर्ग नगरपरिषदांतही ही मोहीम राबविली जावी, असाही निर्णय सरकारने घेतला आहे. राज्यातील अ, ब आणि क वर्गाच्या अनेक नगरपरिषदांत हाताने मैला साफ करण्याची प्रथा कायम आहे, असा या निर्णयाचा स्पष्ट निष्कर्ष निघतो.



'मॅनहोलकडून मशीनहोलकडे' असे या मोहिमेचे नामकरण करण्यात आले आणि या योजनेच्या अंमलबजावणीकरिता तब्बल ५०२ कोटी ४० लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यताही देण्यात आली. पाचशे कोटींहूनही अधिक रक्कम खर्चून या प्रथेला पर्याय निर्माण करण्याची गरज अधोरेखित झाली त्याआधी या प्रथेमुळे अनेक मानवी जीव गुदमरून मृत्युमुखी पडल्याच्या नोंदी महाराष्ट्रात झाल्या आहेत.

सुमारे चार वर्षांपूर्वी मुंबईत गोवंडी येथे एका खाजगी गृहसंकुलातील सेप्टिक टँकची स्वच्छता करताना तीन कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला. या कामगारांच्या कुटुंबास कायद्यानुसार नुकसान भरपाई मिळावी यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली. हाताने मैला साफ करण्याच्या प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा २०१३ मध्ये अस्तित्वात आला. या कामाकरिता मानवी हातांचा वापर करू नये असेही या कायद्याने बजावले आहे. असे काम करणाऱ्या कुटुंबांना उदरनिर्वाहाचे पर्यायी स्रोत उपलब्ध करून देऊन त्यांचे पुनर्वसन करावे असेही या कायद्याने स्पष्ट केले आहे. तरीदेखील हाताने मैला साफ करण्याची लज्जास्पद कुप्रथा राज्यात सुरू कशी, असा सवाल न्यायालयाने केला होता. हाताने मैला साफ करण्याची प्रथा अस्तित्वात राहणार नाही याची खबरदारी घेण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे, असा परखड इशाराही न्यायालयाने त्या सुनावणीत दिला होता. ही प्रथा जिवंत असल्याच्या जाणिवेवर न्यायालयाच्या त्या इशाऱ्यानेच शिक्कामोर्तब केले आहे.

संसदेच्या दोन वर्षांपूर्वीच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान या प्रथेविषयी सभागृहासमोर प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा घडून आली. २०१८ ते २०२३ या पाच वर्षांत देशभरातील विविध राज्यांत मलद्रव्ये साफ करणाऱ्या ४०० हून अधिक कामगारांचा गुदमरून मृत्यू झाल्याची आकडेवारी सामाजिक न्याय विभागातर्फे सभागृहामार्फत देशासमोर उघड झाली. २०२३ या एका वर्षात ४९ कामगार मृत्युमुखी पडल्याची माहिती समाजकल्याण मंत्री रामदास आठवले यांनी दिली होती. २०१३ ते २०१८ या पाच वर्षांत देशातील या प्रथेचे अस्तित्व शोधण्यासाठी दोन सर्वेक्षणे करण्यात आली आणि तब्बल ५० हजारांहून अधिक कामगार मानवी मलद्रव्ये स्वच्छ करून उदरनिर्वाह करतात, असे निष्पन्न झाले. ५० हजार कुटुंबांच्या चरितार्थाचे हे साधन आहे, ही लज्जास्पद बाब या सर्वेक्षणातून उघड झाली आणि अधिक शोध घेतला गेला. यापैकी उत्तर प्रदेशातील सफाई कामगारांची संख्या सर्वाधिक म्हणजे ३२ हजार ५०० इतकी होती, तर त्याखालोखाल दुसऱ्या क्रमांकावरील महाराष्ट्रात सहा हजार ३२५ कामगारांची नोंद झाली होती. २००७ मध्ये महाराष्ट्रात हाताने मलद्रव्ये साफ करणाऱ्या कामगारांची संख्या ४५ हजार ६०० एवढी होती. सेफ्टिक टँक किंवा विषारी वायू असलेली भूमिगत गटारे साफ करताना येणाऱ्या दुर्दैवी मृत्यूंची एक आकडेवारीच केंद्र सरकारने जारी केली होती. १९९३ मध्ये कायदा अस्तित्वात आल्यापासून जून २०२२ पर्यंतच्या सुमारे दहा वर्षांत देशाच्या वेगवेगळ्या राज्यांत भूमिगत गटारे आणि सेफ्टिक टँक सफाई करणाऱ्या ९६६ कामगारांचा मृत्यू ओढवला होता, त्यापैकी ४१ दुर्घटना महाराष्ट्रात घडल्या होत्या. तामिळनाडूत २१८, तर गुजरातमध्ये १३६ कामगार मृत्युमुखी पडले होते. एकट्या दिल्लीत त्या काळात ९९ कामगारांचा मृत्यू झाला होता.

हाताने मलद्रव्ये सफाई करणारे कामगार आणि धोकादायक द्रव्यांच्या भूमिगत वाहिन्या स्वच्छ करणारे कामगार यांमध्ये फरक असतो. मानवी मलद्रव्यांची सफाई करणाऱ्या कामगारांना या प्रथेपासून मुक्त करावे व त्यांचे सन्मानजनक पुनर्वसन करावे असे २०१३ मध्ये लागू झालेल्या कायद्याने स्पष्ट केले आहे. तरीही जानेवारी २०२४ मध्ये देशातील सुमारे ५० जिल्ह्यांत ही प्रथा अस्तित्वात होती. मार्च २०२४ मध्ये महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतल्या गेलेल्या निर्णयानुसार, मॅनहोल ते मशीनहोल नावाची योजना राज्यात सुरू असेल, तर या कुप्रथेचे उरलेसुरले अवशेष महाराष्ट्रातून नामशेष व्हावेत आणि या लज्जास्पद कामातून मुक्त होऊन त्या कामगारांना जगण्याची प्रतिष्ठा मिळायला हवी. तसे झाले तर स्वच्छ भारत नावाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचे अमृतकाळातील ते मोठे यश ठरेल आणि दयनीय रीतीने होणाऱ्या मृत्यूंनाही आळा बसेल. मुख्य म्हणजे, जातिव्यवस्थेच्या उतरंडीमुळे वाटणीला येणारी दुर्दशा संपविण्याकरिता ही मोहीम तीव्र होणे गरजेचे आहे. ऑगस्ट २०२३ नंतर या देशात हाताने मैला साफ करण्याची प्रथा अस्तित्वात नसेल, असा निर्धार केंद्र सरकारकडून व्यक्त झाला होता. त्याला आता दोन वर्षे उलटून गेली आहेत. या कामातील कामगारांकरिता पर्यायी रोजगारसंधी उपलब्ध कराव्या लागतील, त्यांच्या कौटुंबिक पुनर्वसनाकरिता योजना तयार कराव्या लागतील आणि अशा कामाकरिता यंत्रे, उपकरणांचा वापर करण्याचे तंत्र आत्मसात करावे लागेल. ही कुप्रथा संपूर्ण नामशेष व्हावी असे आवाहन खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेकदा केले आहे. या कुप्रथेचे राज्यातून निर्मूलन कसे करणार यासंबंधीचा कृती आराखडा सादर करावा आणि राज्यस्तरीय तसेच जिल्हास्तरीय देखरेख समित्यांनी ही प्रथा रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती द्यावी असा आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिला होता. 'मॅनहोल ते मशीनहोल' योजना आखून राज्य सरकारने त्यासंबंधी पावले उचलली होती. ती पावले पुढे पडण्याची गरज सांगलीजवळच्या गेल्या आठवड्यातील घटनेमुळे अधोरेखित झाली आहे.

माणूस म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येकाच्या प्रतिष्ठेचा स्तर जेव्हा समान होईल, तेव्हा सामाजिक न्यायाची संकल्पना खऱ्या अर्थाने प्रस्थापित होईल. अशा सामाजिक न्याय व्यवस्थेत जात, धर्म, पंथ किंवा कोणत्याही पेशाचा अडसर असणार नाही. पण ही सामाजिक समतेची एक स्वप्नवत व्याख्या झाली. प्रत्यक्ष मानवी व्यवहारांत हेच तर मोठे अडसर असल्यामुळे, माणसाच्या प्रतिष्ठेचे स्तर याच बाबींवरून ठरत असतात. सामाजिक समतेचा आणि वैचारिक पुरोगामित्वाचा उद्घोष करणाऱ्या महाराष्ट्रात अजूनही अशाच कुप्रथांच्या ओझ्याखाली पिचलेला वर्गदेखील दिसतो आणि त्याच्या समस्यांची ओझी दूर करण्याच्या आणाभाका घेणारा वर्गही दिसतो. गेल्या अनेक वर्षांपासून, न्यायालये, सामाजिक जाणिवा असलेला समाजघटक, स्वयंसेवी संस्था, कामगार संघटना, आंतरराष्ट्रीय संस्था वगैरे सर्व स्तरांवर आवाज उठवून, इशारे देऊन आणि प्रसंगी आंदोलनेही उभारूनही, महाराष्ट्रातील एक कुप्रथा अजूनही जिवंत असल्याचे उघडकीस येणे ही लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल. सामाजिक स्तरांच्या उतरंडीवर माणसांस बसवून त्याच्या प्रतिष्ठेचाच अपमान करण्याच्या मानसिकतेशीच या कुप्रथेचा संबध असला पाहिजे. कारण, समाजातील काही ठरावीक समूहांच्याच नशिबी या कुप्रथेचे ओझे वाहण्याची दुर्दैवी वेळ आल्याचे दिसते. या कामामुळे समाजातील एखाद्या घटकाच्या प्रतिष्ठेची किंमत कवडीमोल झालेली आहेच, पण त्याच्या जगण्याच्या अधिकारांवरही बेपर्वाईची टांगती तलवार असल्याचे स्पष्ट झाले आहे. २०११ च्या जनगणनेत देशात तब्बल २६ लाख शौचालये अनारोग्यकारी असल्याचे स्पष्ट झाले होते. अशा शौचालयांच्या सफाईसाठी वापरल्या जाणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना या कामातून मुक्त करण्याचे संकल्पही सोडण्यात आले. ही कामे करणारे १०० यंत्रमानव खरेदी करण्याचा विचार असल्याचे राज्य सरकारने जाहीर केले होते. पण या कागदी घोड्यांनी या समस्येच्या मैदानात कोणते शौर्य गाजविले, ते गुलदस्त्यातच राहिले आहे. ही कुप्रथा कायमची नष्ट कधी होणार आणि प्रतिष्ठेचे मोल मातीमोल ठरविणाऱ्या या कुप्रथेत गुरफटलेल्यांना मुक्ती कधी मिळणार हा प्रश्न त्या समस्येसारखाच ओझे होऊन राहिला आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### सनातन धर्मानुसार वाढदिवसाचा विधी

नुकताच 'तरुण भारत'मधील एका लेखामध्ये वाढदिवस साजरा करण्याच्या पाश्चात्त्य पद्धतीचा निषेधात्मक उल्लेख आहे. त्यानिमित्त आपल्या सनातन धर्मात असलेल्या वाढदिवसाच्या विधीची माहिती द्यावी असे वाटते. आपल्याला नेहमी बघून, ऐकून वाढदिवसाला केक कापणे, पुढची विकृती म्हणजे तो तोंडाला फासणे आणि मेणबत्ती विझविणे हे सामान्य वाटू लागले आणि ती प्रथा पडली. त्यातल्या त्यात कुणी सुधारणा करून म्हणजे घरी केलेला केक व मेणबत्ती न विझविता लावणे असं करतात, पण मूळ गाभा तसाच असतो.

आपल्या सनातन धर्मात वाढदिवसाचा नेमका विधी आहे हेच आपल्याला ठावूक नाही व त्यामुळे प्रचलित नाही. विनायकशास्त्री आर्वीकर आणि आमचे पुरोहित जयंत देव गुरुजी (९४२३६३७९०४) यांनी सांगितल्याप्रमाणे हा एक छोटासा विधी आहे. सर्वप्रथम गणपती वंदन आणि संकल्प करणे. मग ज्या व्यक्तीचा वाढदिवस आहे तिने हातात एका वाटीत/ फुलपात्रात थोडेसे दूध, गूळ व तिळ यांचे मिश्रण घेऊन सप्त चिरंजीवाची प्रार्थना असलेला श्लोक म्हणून ते दूध मिश्रण प्राशन करणे.

दुग्ध प्राशनाचा मंत्र असा-

**सतिलं गुड संमिश्र अंज्यलर्धमितं पयः ।**
**मार्कंडेयात वरं लव्धा पिबाम्यायुर्विवृद्धये ।**

त्यानंतर हातात थोडेसे तिळ घेऊन पुढील मंत्र म्हणावा. तिलदानाचा मंत्र-

**तिलाः कश्यपसंभूस्तातिलाः पापहराः शुभाः ।**
**तिलपात्रप्रदानेन अतः शान्ति प्रयच्छ मे ॥**

आणि ते तिळ एका मंदिरात दान करावे. त्याव्यतिरिक्त ऐपतीनुसार एखाद्या संस्थेला जास्त प्रमाणात दान करता येईल. त्यानंतर, एका ताम्हणामध्ये तूप घेऊन त्यात मुखावलोकन करणे व पुढील श्लोक म्हणणे.

आज्यावलोकनाचा मंत्र-

**आज्यं तेजः समुदिष्टं, आज्यं**
**पापहरं स्मृतम ।**
**आज्यं सुराणामहार आज्ये देवाः प्रतिष्ठताः ॥**

त्यानंतर प्रदीर्घ श्वास घेऊन त्याचा उःश्वास तुपात हळुवारपणे सोडणे. (ते तूप दिव्यात घालून मारुती किंवा महादेवाच्या मंदिरात दिवा लावणे.) हे सर्व झाल्यावर घरातील उपस्थित व्यक्तींनी (पुरुष सुद्धा) औक्षण करावे आणि भेटवस्तू देणे वगैरे. हे सर्व करायला १० मिनिटे लागतात. माझी माहिती परिपूर्ण नसेलही परंतु जिज्ञासूंनी अधिक माहिती व शास्त्रार्थ तज्ज्ञ व्यक्तींकडून जाणून घ्यावा.

**डॉ. धनंजय काणे**/९४२३४०५७४५

••••

### राजमाता जिजाऊ : हिंदवी स्वराज्याचे प्रेरणास्थान

राजमाता जिजाबाई शहाजी भोसले (जिजाऊ) या केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर त्या स्वराज्याच्या प्रेरणास्थान आणि खऱ्या अर्थाने शिल्पकार होत्या. त्यांचा जन्म पौष पौर्णिमा १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे झाला. जिजाऊंना बालपणापासूनच युद्धकला, राजकारण आणि घोडेस्वारीचे शिक्षण मिळाले होते. जिजाबाईंचे लग्न शहाजीराजे भोसले यांच्याशी झाले. त्या काळात महाराष्ट्र परकीय आक्रमकांच्या (निजामशाही, आदिलशाही आणि मुघल) अंमलाखाली होता. स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि मंदिरांची होणारी विटंबना पाहून जिजाऊंच्या मनात स्वराज्य स्थापनेचे बीज रुजले. त्यांनी हेच स्वप्न शिवरायांच्या डोळ्यात रुजवले. शिवरायांना घडवण्यात जिजाऊंचा सिंहाचा वाटा आहे.

त्यांनी शिवरायांना रामायण, महाभारत आणि पराक्रमी पुरुषांच्या गोष्टी सांगितल्या. न्यायनिवाडा कसा करावा, प्रजेची काळजी कशी घ्यावी आणि संकटात धीर न सोडता कसे लढावे, याचे बाळकडू दिले. शहाजीराजे बंगळुरूला असताना, पुण्याची जहागीर सांभाळण्याची आणि शिवरायांना तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी जिजाऊंनी समर्थपणे पेलली. पुण्याचा कायापालट केला. शिवाजी महाराज मोहिमेवर असताना स्वराज्याची जबाबदारी जिजाऊच सांभाळत असत. अफझलखान वध असो वा आग्रा सुटका, प्रत्येक कठीण प्रसंगी जिजाऊ महाराजांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. स्त्रीशक्तीचे प्रतीक असलेल्या त्या केवळ एक माता नव्हत्या, तर एक कुशल प्रशासक आणि न्यायनिवाडा करणाऱ्या राजमाता होत्या. शिवराज्याभिषेकाचा सुवर्ण सोहळा पाहिल्यानंतर अवघ्या १२ दिवसांनी, १७ जून १६७४ रोजी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथे त्यांचे निधन झाले.

जिजाऊ माता आजही प्रत्येक भारतीयासाठी स्वाभिमान, संस्कार आणि धैर्याचे प्रतीक आहेत. म्हणूनच त्यांना स्वराज्यजननी म्हटले जाते. राजमाता जिजाऊंचे जीवन केवळ इतिहास नसून तो आजच्या पिढीला घडवण्याचा एक वस्तुपाठ आहे. आजच्या पालकांनीही जिजाऊप्रमाणे मुलांच्या बुद्धीसोबतच त्यांच्या चारित्र्यावर, मूल्यांवर आणि धर्म संस्कारावर भर द्यावा. केवळ करीअर नाही, तर कर्तव्य शिकवणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक घरात जिजाऊ घडली, तरच घराघरात शिवबा घडेल.

**वर्षा आवदे**/नागपूर

••••

### सोशल मीडियाचा वापर आणि डिजिटल गुलामगिरी

आजच्या काळात सोशल मीडिया हा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. संवाद, माहिती आणि संपर्कासाठी हे माध्यम उपयुक्त असले, तरी त्याचा अतिरेक आपल्याला नकळत एका वेगळ्याच मानसिक गुलामगिरीकडे नेत आहे. मी मागील दहा ते बारा वर्षांपासून सोशल मीडियाचा वापर करत आहे. मी या माध्यमावर फारसा सक्रिय नसलो, तरी त्याचे बदलते स्वरूप आणि मानवी वर्तनावर होणारा परिणाम अनुभवत आलो आहे. नोव्हेंबर महिन्याच्या २९ तारखेला माझा वाढदिवस असतो. दरवर्षी फेसबुक आणि व्हॉट्सॲपवर मित्र, सहकारी आणि नातेवाईकांकडून मोठ्या प्रमाणावर शुभेच्छा मिळत असत. मात्र मागील वर्षी मी माझा फेसबुक अकाऊंट बंद केला. त्यानंतर सोशल मीडियावर कुठल्याही माध्यमातून वाढदिवसाच्या शुभेच्छा मिळाल्या नाहीत. तथापि, काही मोजक्या व्यक्तींनी मला प्रत्यक्ष फोन करून किंवा वैयक्तिक संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या. या अनुभवातून एक महत्त्वाची गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, खऱ्या अर्थाने महत्त्वाच्या नात्यांना सोशल मीडियाची गरज नसते. सोशल मीडियावरील शुभेच्छांची सवय असल्यामुळे काही क्षण मन अस्वस्थ झाले, पण त्याचवेळी हेही उमगले की, सतत अशा प्रतिक्रियांची अपेक्षा ठेवणे हीच एक प्रकारची डिजिटल गुलामगिरी आहे. आज आपण कुठेही फिरायला गेल्यानंतर त्या ठिकाणाचा अनुभव घेण्याआधीच मोबाईल कॅमेऱ्यातून फोटो काढतो, ते सोशल मीडियावर पोस्ट करतो आणि नंतर लाईक्स, कमेंट्स व व्ह्यूजची वाट पाहतो. हा आनंद स्वत:साठी नसून इतरांसाठी सादर केला जातो. परिणामी, आपण आपले जीवन जगण्याऐवजी प्रेक्षकांसाठी जगू लागतो. फोटो काढणे किंवा सोशल मीडियावर पोस्ट करणे हे चुकीचे नाही. मात्र प्रश्न असा आहे की, आपण हे सर्व करताना खरोखर आनंदी आहोत का, की फक्त इतरांच्या प्रतिक्रियांवर आधारित आपली प्रतिमा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहोत? आज अनेकदा सोशल मीडिया हे आनंदाचे साधन न राहता, मान्यतेचे व्यासपीठ बनले आहे.

काही लोक असेही आहेत, जे आयुष्यातील क्षण सोशल मीडियावर न मांडता प्रत्यक्ष अनुभवतात. त्यांच्यावर कुठलाही प्रेक्षकांचा दबाव नसतो. ते आयुष्य जसे आहे तसे स्वीकारतात आणि जगतात. अशा जीवनशैलीत मानसिक स्वातंत्र्य अधिक असते. कॅमेरा हा आपल्या आठवणी जपण्यासाठी निर्माण झाला होता. मात्र आज तो वर्तमान क्षण बाजूला ठेवून भविष्यातील लाईक्स आणि कमेंट्ससाठी वापरला जात आहे. याचाच विचार करून आपण सोशल मीडियाचा वापर किती, कसा आणि का करतो, याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

**डॉ. स्वप्निल धनराज अंबादे**/नागपूर

••••

### निष्ठा आणि विचारधारेचे द्वंद्व

हल्ली राजकीय क्षेत्रात एक वेगळीच घाई-गर्दी जाणवते. पक्षातील कार्यकर्ते उमेदवारी मिळविण्यासाठी आतूनच रस्सीखेच करताना दिसतात. जणू काही समाजसेवेचे प्रवेशद्वार एकच विधानभवनातील खुर्ची. मग प्रश्न उभा राहतो, समाजसेवा निवडणूक जिंकल्यावरच सुरू होते का? लोकप्रिय असणे आणि निवडणूक जिंकणे यात फरक नाही का? याच प्रश्नांच्या छायेत कार्यकर्ते, पक्षनिष्ठा, तत्त्वनिष्ठा आणि विचारधारा यावर चिंतन करणे आवश्यक ठरते. लोकप्रिय असणे म्हणजे लोकांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाला दिलेली दाद. पण निवडणूक हा भावनांचा सण नसून समीकरणांचा खेळ असतो. जात, धनबल, मतदारसंघाची मांडणी, कार्यकर्त्यांचे जाळे, स्थानिक गटतट, हे सारे घटक मिळून निवडणुकीचा परिणाम ठरवतात. म्हणूनच अनेकदा लोकमान्य व्यक्ती पराभूत होते, तर अपरिचित चेहरा विजयी ठरतो. लोकप्रिय असणे वेगळे आणि निवडणूक जिंकणे वेगळे, हे सत्य स्वीकारणे आवश्यक आहे.

मात्र यातून एक मोठी विसंगती ठळक होते. पक्षनिष्ठा आणि तत्त्वनिष्ठा कुठे तरी हरवत चालली आहे. पूर्वी पक्ष म्हणजे विचारांची शाळा. विचारधारा म्हणजे जीवनपद्धती. पक्षाचे कार्यकर्ते हे त्या तत्त्वांचे वाहक असत. आज मात्र उमेदवारी म्हणजे प्रतिष्ठेचा मुकुट आणि पक्ष म्हणजे सत्तेची शिडी. कार्यकर्त्यांची धावपळ तत्त्वांसाठी नसून तिकिटासाठी अधिक दिसू लागल्याने राजकारणाचा आत्मा कसल्याशा मुखवट्यामागे लपून बसला आहे. समाजसेवा म्हणजे केवळ निधी मंजूर करणे किंवा मोठ्या पदावरून आदेश देणे नव्हे. समाजसेवा म्हणजे लोकांमध्ये मिसळणे, त्यांच्या वेदना समजून घेणे, समस्यांना उपाय शोधणे. हे कार्य पदाविना देखील शक्य आहे. उलट, पद नसलेला कार्यकर्ता अधिक मुक्तपणे काम करू शकतो. त्याला सत्ता, दबाव, प्रतिमा अशा बंधनांचे ओझे नसते. तरीही आज आपल्याला दिसते ते असे की समाजसेवेची ओळख हळूहळू खुर्चीशी जोडली जात आहे. यात कार्यकर्त्यांचीही काहीशी चूक आणि समाजाचीही. आपण कार्यकर्त्याला तेव्हाच मान देतो जेव्हा तो पुढाऱ्यांच्या जवळ दिसतो, जेव्हा त्याच्या हातात एखादे पद असते. मग स्वाभाविकच कार्यकर्ता पदाच्या मागे धावणार. पक्षांनाही लोकप्रियतेपेक्षा निवडणूक जिंकणारा 'योग्य' उमेदवार हवा असतो. अशा चक्रात विचारधारा दुय्यम बनते.

परंतु कोणत्याही पक्षाची खरी ताकद हे त्याचे तत्त्व आणि त्याला जगणारे कार्यकर्ते. जेव्हा कार्यकर्ता पक्षनिष्ठेपेक्षा तत्त्वनिष्ठेला प्राधान्य देतो, तेव्हा राजकारण केवळ सत्तास्पर्धा राहत नाही; ते जनतेच्या आशा-अपेक्षांचे प्रतिनिधित्व बनते. अन्यथा पक्ष फक्त रंग, चिन्ह आणि घोषणांची कंपनी बनून राहते. आजच्या कार्यकर्त्यांनी स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा की मी तिकीट मिळविण्यासाठी पक्षात आहे की विचार जगविण्यासाठी? समाजालाही विचार करायला हवा की आपण खुर्चीवर बसलेल्या माणसालाच समाजसेवक मानणार का, की त्यासाठी त्याच्या कृतींचे मोल करणार? लोकशाही केवळ मतदानाचा उत्सव नाही; ती विचारांचा प्रवास आहे. लोकप्रियता मिळविणे हे साधन असू शकते, पण अंतिम ध्येय समाजभान आणि जबाबदारीची जाणीव असली पाहिजे. पद मिळाले किंवा नाही तरी तत्त्वनिष्ठ राहणारा कार्यकर्ता हा खरा लोकशाहीचा प्रहरी असतो. आणि विचारधारा जिवंत ठेवणारा पक्षच समाजाच्या इतिहासात आपली नोंद सुवर्णाक्षरांनी करू शकतो.

**विवेक गडकर**/९३७०३२४१०५

••••

### यातला एक निवडायचा आहे

आधीपासून असलेले, आज आलेले, काल आलेले, परवा आलेले, मागच्या महिन्यात आलेले, मागील वर्षी आलेले, मागच्या निवडणुकीत आलेले, एकदा जाऊन परत आलेले, परत जाऊन परत आलेले, येऊन जाऊन असलेले, परत परत येऊन जाऊन असलेले, यातला एक निवडायचा आहे.



पक्षाशी निष्ठा असलेले जुने, पक्षाशी निष्ठा असलेले नवे, पक्षात राहून बाहेरख्याली असलेले, साहेबांशी निष्ठा असलेले जुने, साहेबांशी निष्ठा असलेले नवे, हृदयसम्राटाशी इमान असलेले जुने सैनिक, हृदयसम्राटाशी इमान आणलेले नवे सैनिक, गांधी, नेहरूंचे मीठ खाल्लेले, गांधी, नेहरूंचे मीठ खाण्यास आलेले, यातला एक निवडायचा आहे. तुरुंगात गेलेले, जाऊन आलेले, तुरुंगाच्या वाटेवरचे, आरोप झालेले, जामिनावर सुटलेले, जामीन अर्ज केलेले, पॅरोलवर सुटलेले, सुप्रीम कोर्टात सुटलेले, हायकोर्टात गेलेले, खालच्या कोर्टात अडकलेले, यातला एक निवडायचा आहे. फुकट वीज, फुकट पाणी, कर्जमाफी, सबसिडी, फुकट राशन, फुकट बेकारभत्ता, फुकट यात्रा, फुकट रस्ते, बोलाची कढी, बोलाचा भात, यातील जास्तीत जास्त देऊ म्हणणारा यातला एक निवडायचा आहे.

भाईचा माणूस, दादाचा माणूस, बाबाचा माणूस, अण्णाचा माणूस, काकांचा माणूस, अध्यक्षांचा माणूस, उपाध्यक्षांचा माणूस, साहेबांचा माणूस, जातीचा माणूस, धर्माचा माणूस, गावाचा माणूस, गुरूचा शिष्य, गटाचा माणूस यातला एक निवडायचा आहे.

पक्षाचा अधिकृत, पक्षाचा अनधिकृत, पक्षात आयात केलेला, पक्षाने निर्यात केलेला, फिक्स झालेला, पाठिंबा दिलेला, छुपा पाठिंबा मिळालेला, आतून पाठिंबा दिलेला, बाहेरून पाठिंबा मिळालेला, आतून विरोध असलेला, बाहेरून विरोध असलेला, आपल्यातला त्यांचा, त्यांच्यातला आपला यातला एक निवडायचा आहे.

शंभर कोटी जमवलेला, हजार कोटी बाळगून असलेला, गावोगावी जमिनी करणारा, बायकोला श्रीमंत करणारा, सासूच्या नावावर फ्लॅट घेणारा, मेव्हणीला जमीन घेऊन देणारा, मेव्हण्याला पीए करणारा, भाजीवाल्याला फ्लॅट घेऊन देणारा, ड्रायवरला कंपनी काढून देणारा यातला एक निवडायचा आहे.

सहकारमहर्षी, शिक्षणसम्राट, मद्यसम्राट, वाळूसम्राट, जमीनसम्राट, कोळसासम्राट, खाणसम्राट, हृदयसम्राट यातला एक निवडायचा आहे. कॉमनवेल्थमध्ये गेम केलेला कोळशात काळा झालेला, जल संधारणात घोटाळा केलेला, महाराष्ट्र सदनात भ्रष्टाचार केलेला, टोळधाडीत सामील असलेला, बँकेत घोटाळे केलेला, मनरेगात घोटाळा केलेला, टीडीआरचा घोटाळा केलेला, देवाच्या नावाने घोटाळा केलेला, गांधीच्या नावाने घोटाळा केलेला, ट्रस्टच्या नावाने घोटाळा केलेला यातला एक निवडायचा आहे. खळखट्याक करणारा, भाषेवरून मारणारा, राडेबाजी करणारा, बस पेटवणारा, ट्रेन जाळणारा, कारच्या काचा फोडणारा, लोकांना भडकवणारा, भाईचा पाठीराखा, झोपडपट्टीचा दादा, अतिक्रमण करणारा, सात-बारा नावावर करणारा, अनधिकृत बांधकाम करणारा यातला एक निवडायचा आहे.

यादी फार मोठी आहे. मी फक्त सुरुवात केली. वाढव यादी तुझी तू. पण मतदार गड्या तुला वेळ तरी कुठे आहे! चल उठ कोणातरी एकावर ठप्पा मार, मग महागाईचा विचार कर, मग भ्रष्टाचारावर बोल, मग शिक्षणाच्या घसरणाऱ्या दर्जावर बोलत राहा, मग बेकारीवर बोल, मग बलात्कारावर चर्चा कर, मग वाढणाऱ्या विकास खर्चावर बोल, मग ढासळणाऱ्या मूल्यांवर बोल, बोलत बस, बोलत बस आणि कोकलत बस. पुढची पाच वर्षे तुझीच आहेत, उगाच घाई करू नको, पहिले त्यांना निवडून दे. ती लोकशाहीची गरज आहे. तुला तुझ्यावर शासन लागते, तुला तुझ्यावर सरकार लागते, तुला तुझ्यावर लोकसभा लागते, तुला तुझ्यावर विधानसभा लागते. त्यांच्याशिवाय तुझे जीवन अधुरे आहे. त्यांना पहिले निवडून दे. तेवढाच तुझा हक्क आहे.

**रवी वाघमारे**/नागपूर

••••

### नवीन वर्षातील सकारात्मक बदल

इंग्रजी वर्ष २०२६ या वर्षाच्या सुरुवातीलाच अनेक सकारात्मक बदलांची नोंद होते आहे. जनतेच्या सुविधेसाठी यावर्षी नवीन अत्याधुनिक जलदगती महामार्ग जोडले जाणार आहेत. पूर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण या दिशांना जोडणाऱ्या एक्सप्रेसवे नेटवर्कमुळे औद्योगिक केंद्रे, बंदरे, धार्मिक स्थळे आणि पर्यटन हब यांच्यातील अंतर मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे अशी माहिती मिळाली आहे. रेल्वेच्या वेळापत्रकात देखील मोठे बदल होणार आहेत. यानुसार सुमारे ६२ एक्सप्रेसचा वेग वाढणार आहे. यात पुणे मुंबईतील अनेक गाड्यांचा समावेश आहे. हे सुधारित वेळापत्रक प्रवाशांची एकाच वेळी होणारी गर्दी कमी करण्यासाठी आणि अधिक सुविधेसाठी सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले जाते.

या वर्षी उल्लेखनीय बाब म्हणजे नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटनाला किंवा हॉटेल्स, पब, डिस्को, क्लब येथे जल्लोष करण्याला प्राधान्य देणारी तरुणाई या वर्षी धार्मिक तीर्थस्थळांकडे मोठ्या प्रमाणात वळली आहे असे चित्र दिसले. हे परिवर्तन धार्मिक स्थळांचा विकास आणि धर्मजागृती यामुळे बघावयास मिळाले. अयोध्या, मथुरा, काशी विश्वनाथ, उज्जैन या देशातील विविध स्थळांवर ३०, ३१ आणि १ तारीख या दिवसांत विविध वयोगटांतील नागरिकांची तुफान गर्दी होती. नागपूर तसेच आसपासच्या प्रमुख मंदिरांमध्ये भक्तांची दर्शनासाठी भली मोठी रांग लागल्याचे चित्र दिसून आले. अनेक ठिकाणी दर्शनार्थींच्या संख्येचे विक्रम मोडले गेले आहेत. ही धर्मजागृती समाधानकारक आहे.

परंतु या सगळ्या बरोबरच असमानता, दहशतवाद, हिंसा कमी व्हावी आणि भारत अधिक विकसनशील आणि प्रगत व्हावा यासाठी आपण हातभार लावूया.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

••••

### देश महत्त्वाचा की खेळ?

सध्या बांगलादेशात हिंदूंवर होत असलेला अमानुष अत्याचार, मंदिरांची तोडफोड, हत्या आणि जीव मुठीत धरून जगण्याची वेळ आलेल्या हिंदूंची अवस्था पाहता प्रत्येक संवेदनशील भारतीयाच्या मनात तीव्र संताप आणि वेदना निर्माण झाल्या आहेत. या पृष्ठभूमीवर भारताने बांगलादेशविरोधात कठोर पावले उचलावीत, अशी मागणी देशभरातून होत आहे आणि त्याची प्रकर्षाने आवश्यकता देखील आहे. अशा अत्यंत गंभीर परिस्थितीत आयपीएलच्या लिलावात अभिनेता शाहरुख खान मालकीच्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) संघाने बांगलादेशी गोलंदाज मुस्तफिजूर रहमान याला तब्बल ९.२ कोटी रुपयांची बोली लावून संघात सामील करून घेणे, हे कितपत योग्य आहे? बांगलादेशातील हिंसाचार, तिथे वाढलेल्या भारतविरोधी कारवाया, सीमेवरील तणाव या सर्व परिस्थितीत भारताचे शत्रू राष्ट्रांपासून रक्षण करणे असे गंभीर मुद्दे समोर असताना; शत्रुराष्ट्राला साथ देणाऱ्या देशाच्या खेळाडूंवर पैशांची उधळण करणे, याला काय म्हणावे? ही एक प्रकारे देशविरोधी कृती आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. खेळाला सीमारेषा नसतात, हे अगदी योग्य आहे. मात्र जेव्हा राष्ट्राच्या सुरक्षेचा आणि अखंडतेचा प्रश्न असतो तेव्हा देशापेक्षा खेळ महत्त्वाचा की खेळापेक्षा देश महत्त्वाचा याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

बांगलादेशातील काही कट्टरपंथी संघटना आणि पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा आयएसआय यांच्या संगनमताने भारताविरोधात षड्यंत्र रचले जात असल्याच्या बातम्या वारंवार समोर येत आहेत. भारताच्या ईशान्येकडील राज्यांना मुख्य भूमीशी जोडणारा 'सिलिगुडी कॉरिडॉर' (चिकन नेक) हा भाग शत्रराष्ट्रांच्या निशाण्यावर आहे. अशा परिस्थितीत ज्या देशातील सरकार आणि संघटना भारताच्या विरोधात कारस्थान करत आहेत, त्याच देशाच्या खेळाडूला कोट्यवधी रुपये देणे, नैतिकदृष्ट्या अयोग्य तर आहेच आणि देशहिताला धक्का देणारे आहे. त्यामुळे देश महत्त्वाचा की खेळ? याचा गांभीर्याने विचार करण्यासोबतच या निर्णयाचा विरोध करणे आवश्यक आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### मनपा निवडणूका : पक्ष व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप, प्रचार सुरु

**परभणी / प्रतिनिधी** - महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवारी (दि. ३) पक्ष व अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले.

या निवडणुकीत तब्बल १३ राजकीय पक्ष व आघाड्या निवडणूक रिंगणात उतरल्या असून, त्यांच्यासह अपक्ष उमेदवारांनाही अधिकृत निवडणूक चिन्हे प्रदान करण्यात आली आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विविध पक्षांना त्यांची पारंपरिक चिन्हे देण्यात आली. यामध्ये भारतीय जनता पक्षाला कमळ, शिवसेनेला धनुष्यबाण, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मशाल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला घड्याळ, वंचित बहुजन आघाडीला गॅस सिलेंडर, बहुजन समाज पक्षाला हत्ती, बहुजन मुक्ती पार्टीला टेबल, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकला सिंह, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादूल मुस्लिमीनला पतंग, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला रेल्वे इंजिन, प्रहार जनशक्ती पक्षाला बैट तर आम आदमी पक्षाला झाडू हे चिन्ह देण्यात आले आहे.

याशिवाय अपक्ष उमेदवारांना एकूण १७ वेगवेगळी निवडणूक चिन्हे देण्यात आली असून, त्यामध्ये कपबशी, कोट, फुटबॉल, रोड रोलर, एअर कंडिशनर, दूरदर्शन संच, शिट्टी, छत्री, अंगठी, शिवणयंत्र, नारळ, कपाट, सफरचंद, बस, ट्रक, छताचा पंखा आणि चष्मा या चिन्हांचा समावेश आहे.

सर्व पक्षीय व अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे अधिकृत वाटप झाल्याने आता निवडणूक प्रचाराला वेग आला आहे. उमेदवार आपापल्या चिन्हांसह मतदारांच्या भेटीगाठी, सभा, प्रचारफेऱ्या यासाठी सज्ज झाले आहेत.

### प्रा.रविशंकर झिंगरे यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात

**परभणी / प्रतिनिधी** - येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख प्रा. रविशंकर झिंगरे यांचा सेवागौरव समारंभ बुधवारी (दि. ३१) महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर होते. यावेळी माजी सभापती विजयराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, उपप्राचार्य डॉ. रोहिदास नितोंडे, उपप्राचार्य प्रा. नारायण राऊत, प्रा. रविशंकर झिंगरे, अनुपमा झिंगरे, डॉ. सुरेंद्र येनोरकर, डॉ. विजय कळमसे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर प्रा. झिंगरे यांचा सपत्नीक शॉल, पुष्पहार व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी प्रा. झिंगरे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. प्रा. झिंगरे हे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक असून त्यांनी अध्यापन कार्य निष्ठेने आणि तत्परतेने पार पाडले. साहित्यलेखनाच्या माध्यमातून त्यांनी महाविद्यालय व परभणीचा नावलौकिक वाढवला असून मराठी साहित्याला नवे आयाम दिले. विद्यार्थ्यांमध्ये विषयाची गोडी निर्माण करण्यात त्यांचा विशेष हातखंडा होता, असे ते म्हणाले.

उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी यांनीही मनोगत व्यक्त करताना प्रा. झिंगरे यांचे सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व अधोरेखित केले. अध्यापन आणि लेखन हा त्यांचा स्थायीभाव राहिला आहे. महाविद्यालय, साहित्य व वैयक्तिक जीवन यांची योग्य सांगड घातल्यामुळेच ते साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करू शकले, असे त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व प्रशासकीय संघटनांच्या वतीनेही प्रा. झिंगरे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी केले, तर आभार डॉ. प्रशांत सराफ यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बालविवाह थांबविणे ही सामाजिक चळवळ व्हावी- ॲड. रवींद्र कात्नेश्वरकर :

**परभणी,/प्रतिनिधी :** बालविवाहामुळे कोवळ्या वयात सहन कराव्या लागणाऱ्या वेदनांची समाजाला जाणीव करून देणे अत्यंत आवश्यक असून, संवेदनशील समाजनिर्मितीतूनच हे शक्य आहे. या संवेदना जागृत करण्यासाठी व्यापक जनजागृती हवी आणि बालविवाह थांबविणे ही एक सामाजिक चळवळ व्हायला हवी, असे प्रतिपादन बालकल्याण समिती परभणीचे अध्यक्ष ॲड. रवींद्र कातनेश्वरकर यांनी केले.

येथील श्री सारंग स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शांतिनिकेतन माध्यमिक विद्यालयात शांतिनिकेतन माध्यमिक विद्यालयाच्या पुढाकाराने बालकल्याण समिती परभणी यांच्या माध्यमातून आज शनिवार ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिनानिमित्त विशेष पालक मार्गदर्शन व विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास बालकल्याण समितीचे सदस्य ॲड. गजानन चव्हाण, कोतवाली पोलिस ठाण्याचे माधव धंदे उपस्थित होते.

यावेळी बालकल्याण समितीच्या वतीने पालक व विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा, बालकामगार कायदा तसेच बालविवाह प्रतिबंधक कायदा यांची सविस्तर माहिती देण्यात आली. बालविवाहामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक व मानसिक अडचणी, बालविवाहास उपस्थित राहिल्यास होणारी कायदेशीर शिक्षा तसेच त्यामुळे होणारे गंभीर नुकसान याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बालहक्कांची पायमल्ली होते, हे स्पष्ट करत ॲड. कात्नेश्वरकर यांनी बालविवाहविरोधी हृदयस्पर्शी कविता सादर करून उपस्थितांचे मन

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# मनपा निवडणूकीत प्रभागात दुरंगी व तिरंगी लढती

## भाजपा, शिवसेना शिंदे, उबाठा, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पवार गट, अपक्षांच्या कसरती

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत बहुतांशी प्रभागात भारतीय जनता पाट, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे-काँग्रेस आघाडी या तीन प्रमुख प्रतिस्पध पक्षातील तूल्यबळ उमेदवारातच दुरंगी व तिरंगी लढती होतील, असं चित्र स्पष्ट झालं आहे.

उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतीम मुदतीत म्हणजे शुक्रवार २ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत वैध ठरलेल्या पात्र उमेदवारांपैकी एकूण १९७ उमेदवारांनी आपआपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. यामध्ये हौसे-नवसे-गवसे उमेदवारांचा मोठा भरणा होता. प्रमुख राजकीय पक्षांच्या स्थानिक नेतेमंडळींसह प्रबळ उमेदवारांनी मतविभागणीस अडचणीचे ठरणारे हे हौसे-नवसे-गवसे इच्छुकांबरोबर पडद्याआड गुफ्तगू करीत किंवा अर्थपूर्ण चर्चा करीत मोठ्या शिताफीने रिंगणाबाहेर काढले. त्याचा परिणाम एकूण १६ प्रभागांतर्गत ६५ जागांवरील लढतीत ४११ उमेदवारच शिल्लक राहीले आहेत.

या लढतीत भारतीय जनता पाट, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा गट-काँग्रेस आघाडी प्रामुख्याने एकमेकांविरोधात पूर्ण ताकदिनिशी लढतील, असे चित्र स्पष्ट झाले आहे. शिवसेना शिंदे गटाचेही काही प्रभागातील उमेदवार या स्पर्धेत असतील, परंतु बहुतांशी उमेदवार हे मतविभागणीकरीता निर्णायक ठरतील, असे सर्वसाधारण चित्र आहे. वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पक्ष, जनसुराज्य पक्ष, यशवंत सेना, एमआयएम यासह अन्य पक्षांचेसुध्दा काही उमेदवार रिंगणात आहेत.

एकूण १६ प्रभागांपैकी प्रभाग क्रमांक १ मधून भारतीय जनता पाट विरुध्द काँग्रेस-उबाठा आघाडी, प्रभाग क्रमांक २ मधून काँग्रेस-उबाठा आघाडी विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस, प्रभाग क्रमांक ३ मधून काँग्रेस विरुध्द शिवसेना उबाठा गटात मैत्रीपूर्ण लढत या व्यतिरिक्त राष्ट्रवादी काँग्रेस अशी तिरंगी लढत होत आहे. प्रभाग क्रमांक ४ मधून शिवसेना उबाठा गट, भारतीय जनता पाट व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात तिरंगी लढत होईल व शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार या लढतीत रंगत आणतील, असे चित्र आहे.





प्रभाग क्रमांक ५ मधून शिवसेना उबाठा गट, भारतीय जनता पाट, शिवसेना शिंदे गट व यशवंत सेना अशा चौरंगी लढतीचं चित्र आहे. प्रभाग क्रमांक ६ मधून राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा गट व काँग्रेस यांच्यातच तिरंगी लढत होईल, असे चित्र असून बहुजन मुक्ती पाट, वंचित बहुजन आघाडी, शिवसेना शिंदे गट या लढतीत रंगत आणतील. प्रभाग क्रमांक ७ मधून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पाट व शिवसेना शिंदे गट यांच्यात चार गटात दुरंगी, तिरंगी व चौरंगी लढती होत आहेत. प्रभाग क्रमांक ८ मधून काँग्रेस विरुध्द शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या आघाडीतील दोन्ही मित्रपक्षातच थेट अटीतटीची लढत होत आहे. या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाचेही उमेदवार रिंगणात आहेत.

प्रभाग क्रमांक ९ मधून काँग्रेस-शिवसेना उबाठा गट आघाडी, भारतीय जनता पाट व शिवसेना शिंदे गट अशी तिरंगी लढत होत आहेत.

### अपक्ष उमेदवार डोकेदुखीच ठरणार...

**प्रमुख राजकीय पक्षांनी उमेदवारी नाकारल्यानंतर काही प्रभागांमधून इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी अपक्ष म्हणून आपली उमेदवारी कायम राखली. त्यामुळे हे अपक्ष उमेदवार प्रमुख राजकीय पक्षाच्या प्रबळ उमेदवारांना मतविभागणीकरीता डोकेदुखी ठरु लागले आहेत. हे नाराज उमेदवार रिंगणाबाहेर यावेत, यासाठी त्या त्या पक्षांच्या उमेदवारांसह प्रमुखांनी अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्नांची पराकाष्टा केली. परंतु, फारसे काही हाती आले नाही. पडद्याआडील गुफ्तगू व अर्थपूर्ण चर्चा प्रभावी ठरल्या व यातील बहुतांशी उमेदवार हे मतविभागणीकरीता रिंगणात कायम राहिले आहेत.**

प्रभाग क्रमांक १० मधून राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा, भारतीय जनता पाट व शिवसेना शिंदे गट अशा चौरंगी लढती होवू लागल्या आहेत. प्रभाग क्रमांक ११ मधून काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशा थेट लढती आहेत. तर यशवंत सेना व एमआयएमचेही उमेदवार रिंगणात उतरले आहेत. प्रभाग क्रमांक १२ मधून भारतीय जनता पाट, शिवसेना उबाठा गट, राष्ट्रवादी काँग्रेस यांसह वंचित बहुजन आघाडी, यशवंत सेना तसेच काही प्रभावी अपक्षही रिंगणात आहेत.

प्रभाग क्रमांक १३ मधून राष्ट्रवादी काँग्रेस विरुध्द शिवसेना उबाठा गट व काही गटात काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशी लढत होत आहे. प्रभाग क्रमांक १४ मधून काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशी थेट लढत होत आहे. जनसुराज्य शक्ती, एमआयएम, यशवंत सेनेचेही उमेदवार याठिकाणी रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक १५ मधून भारतीय जनता पाट, शिवसेना उबाठा गट व शिवसेना शिंदे गटात तिरंगी लढती आहेत. प्रभाग क्रमांक १६ मधून शिवसेना उबाठा गट, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात दुरंगी तर काही गटात तिरंगी लढती होवू घातल्या आहेत.

### प्रचाराचा आवाज घुमू लागला

**परभणी,/प्रतिनिधी-** महापालिकेच्या निवडणूकीच्या प्रचाराचा शुभारंभ झाला असून आता गल्लोगल्ली या निवडणूकीचा प्रचाराचा आवाज घुमू लागला आहे. त्यातच आता उमेदवारांना अवघ्या कमी दिवसांत आपला प्रचार करावा लागणार असल्याकारणामुळे आपण त्यांना जास्तीत जास्त मतदारापर्यंत जाण्यासाठी जोमात प्रचार करावा लागणार असून आता काही दिवसांतच हा प्रचार आवाज आणखी वाढणार आहे.

## विद्येचा प्रकाश पसरवणाऱ्या सावित्रीबाई फुले यांना ज्ञानसाधनेत अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी-** ज्ञानसाधना प्रतिष्ठान व सावित्री मंच यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानसाधना प्रतिष्ठानमध्ये दि. ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.





या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थासचिव सौ. शीतल सोनटक्के उपस्थित होत्या. यावेळी संस्थेतील सर्व महिला समन्वयक, महिला विभाग प्रमुख तसेच महिला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याला उपस्थित मान्यवरांनी भावपूर्ण अभिवादन केले. सर्व महिला कर्मचाऱ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्तशुभेच्छा देऊन सावित्रीबाईंच्या विचारांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ शितल सोनटक्के यांनी आपल्या मनोगत आतून सावित्रीबाई फुले यांचा प्रेरणादायी इतिहास व संघर्ष व्यक्त केला.''सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा दीप हातात घेऊन अंधाराशी लढा दिला. अपमान, अडथळे आणि संघर्ष असूनही त्यांनी ज्ञानाचा मार्ग सोडला नाही. आज प्रत्येक महिला शिक्षित, आत्मनिर्भर व आत्मविश्वासाने उभी आहे, हीच त्यांच्या विचारांची खरी जयंती आहे, असे मत मांडले. त्यांच्या विचारांना कृतीत उतरवून स्वतःचा आणि समाजाचा उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करण्याचा नवा दृष्टिकोन सर्व महिलांना दिला.'' स्त्रीसाठी दुर्बलतेकडून सक्षमीकरणाकडे वाटचाल करण्यासाठी शिक्षण ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. स्त्रीने स्वतःचा स्वाभिमान व आरोग्य जपावे असा मोलाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सामाले योगिता यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व महिला कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी थाटले स्वतःचे दवाखाने

### सोनपेठ येथील प्रकार; जिल्हा शल्यचिकित्सकांचा कानाडोळ

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** सोनपेठ येथील ग्रामीण रुग्णालयात शासकीय नौकरीवर असलेल्या काही डॉक्टरांनी शहरात टोलेजंग इमारतींमध्ये खाजगी दवाखाने थाटून गेली पाच वर्षांपासून बिनदिक्कत व्यवसाय सुरू केले आहेत.या प्रकाराची पाठराखण करतंय तरी कोण? आणि अशा गंभीर बाबींची परभणी जिल्हा शैल्य चिकित्सक यांना यत्किंचितही माहिती नसने ही बाबा कितपत योग्य आहे? असा सवाल सर्वसामान्य नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

सोनपेठ तालुका निर्मिती पासून तालुक्यातील रुग्णांच्या सेवेसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र होते. परंतु तालुक्यातील अनेक राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांच्या आणि लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नातून सोनपेठला ग्रामीण रुग्णालयाची मान्यता मिळाली व शासनाच्या निधीतून ग्रामीण रुग्णालयाची टोलेजंग इमारत उभारण्यात आली. ग्रामीण रुग्णालयासाठी पाहिजे त्या प्रमाणात डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांचा अद्यापही तुटवडा आहे. जेमतेम शासकीय व कंत्राटी कर्मचाऱ्यांवर तालुक्यातील रुग्णांची मदार आहे. सध्या या ग्रामीण रुग्णालयात दररोज





उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या २०० ते २५० पर्यंत ची आहे. एखाद्या आजाराची साथ असेल किंवा सोमवार या आठवडी बाजारच्या दिवशी रुग्णांची संख्या जास्तीची असते. शासकीय रुग्णालयामध्ये वैद्यकीय सेवा करणाऱ्या डॉक्टरांनी स्वतःच्या किंवा इतरांच्या खाजगी दवाखान्यात काम करू नये म्हणून शासनाकडून त्यांना ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता देण्यात येतो. जेणेकरून शासकीय दवाखान्यात उपचारासाठी येणाऱ्या गोरगरीब रुग्णावर वेळेत व व्यवस्थित उपचार मिळावेत. येथे काम करणाऱ्या वैद्यकीय डॉक्टरांना शासनाकडून नियमानुसार लाखभर रुपयापेक्षा जास्त पगारही दिल्या जातो. परंतु एवढ्या मोठ्या पगारावरही काही डॉक्टरांचे समाधान होताना दिसून येत नाही. त्यामुळे येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून ग्रामीण रुग्णालयात ड्युटी करण्यासाठी आठवड्यातून दोन-दोन दिवस आपसामध्ये वाटून घेतले जातात व तडजोडीप्रमाणे आठवड्यातून दोन दिवस ड्युटी केल्या जाते. बाकी इतर दिवस संबंधित प्रशासनाच्या नाकावर टिचून बिंदिकितपणे स्वतःच्या दवाखान्यात खाजगी व्यवसाय करण्यात सोनपेठ येथील ग्रामीण रुग्णालयातील काही डॉक्टरांनी सुरुवात केली आहे. ही बाब आरोग्य सेवेच्या दृष्टीने कितपत योग्य आहे? याबाबतीत जिल्हा शैल्य चिकित्सक यांनीच खुलासा करण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या परभणी जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयातील काही डॉक्टर, खाजगीत प्रॅक्टिस करत असल्याचे लोकशासन आंदोलन पार्टीचे परभणी जिल्हाअध्यक्ष सचिन काळे यांनी दि.१० डिसेंबर २०२५ रोजी एका लेखी निवेदनाद्वारे ही बाब जिल्हा शैल्य चिकित्सक यांच्या निदर्शनास आणून दिली होती. याप्रकरणी परभणी जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या डॉक्टरांनी खाजगी व्यवसाय बंद केलाही असेल, परंतु सोनपेठ तालुक्यातील डॉक्टरांनी थाटलेले स्वतःचे दवाखाने जिल्हा शैल्य चिकित्सक पाहतील का? आणि पाहून त्यावर काय कारवाई करणार? याकडे मात्र तालुक्यातील सामान्य जनतेचे लक्ष लागून राहिले आहे. खाजगी दवाखान्यात स्वतःचा व्यवसाय करणारे सोनपेठ येथील ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर कोण? त्यांच्या दवाखान्यांची नावे काय आहेत व ते कुठे आहेत? याबाबतीत सविस्तर वृत्तांत बातमीच्या पुढील भागात लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल.

### श्रीमंत यशवंतराव होळकर राज्याभिषेक दिन मोहत्सव किल्ले वाफगाव जिल्हाप्रतिनिधीपदी देवकते



**ताडकळस,/प्रतिनिधी-** पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात किल्ले वाफगाव येथे श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर यांचा राज्याभिषेकदिन मोहत्सव प्रतिवर्ष ६ जानेवारीला मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो. या सोहळ्याच्या परभणी जिल्हाप्रतिनिधी पदी सामाजिक कार्यकर्ते जयप्रकाश देवकते ( रा. कळगाव ता.पुर्णा)यांची निवड करण्यात आली असून तशा आशयाचे पत्र राज्याभिषेक मोहत्सव समिती प्रमुख श्रीमंत भुषणसिंहराजे होळकर यांनी देवकते यांना प्रदान केले आहे.

राजे मल्हारराव होळकर यांनी १७४९ च्या सुमारास वाफगाव येथे हा भव्यदिव्य भुईकोट किल्ला बांधला. जो महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) यांचे जन्मस्थान आहे. दगडी बांधकाम,सुशोभित कोरीवकाम असलेले प्रवेशद्वार, ( नगारखाना) राजवाडे, भूमिगत धान्याचे कोठार आदी बांधकाम करण्यात आले . हा किल्ला मराठा साम्राज्याच्या संरक्षण आणि लष्करी रणनीतीचा एक महत्वाचा भाग होता. तसेच हा भुईकोट किल्ला होळकर साम्राज्याच्या वैभव व सामर्थ्यशाली इतिहासाचे प्रतिक असुन मराठकालीन स्थापत्यकलेचा एक जिवंत ठेवा आहे. येथे प्रतीवर्षी ६ जानेवारीला श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम)यांचा राज्याभिषेक दिन मोहत्सव हर्षोल्लासात साजरा होतो. यात होळकर घराण्यातील तसेच तत्कालीन त्यांच्या सरदारांचे वंशज व आताच्या विविध क्षेत्रातील मान्यवर सामील होतात. या सोहळ्यात अनेक मर्दानी खेळ व शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात येते. हा राज्याभिषेक दिन सोहळा अधिकाधिक भव्यदिव्य व व्यापक प्रमाणात व्हावा यासाठी उत्सवसमीती प्रयत्नशील असुन राज्यभरात जिल्हा प्रतिनिधींची निवड करण्यात आली आहे. राज्याभिषेक मोहत्सव समिती किल्ले वाफगाव प्रमुख भुषणसिंहराजे होळकर यांनी परभणी जिल्ह्यातील जबाबदारी सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेले जयप्रकाश ( राजेभाऊ) देवकते यांना दिली आहे. सर्व समाजघटकांनी जास्तीतजास्त संखेने या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन महोत्सव समितीचे परभणी जिल्हाप्रतिनिधी जयप्रकाश देवकते यांनी केले आहे.

## मनपा निवडणूकीच्या प्रचारासाठी उमेदवारापुढे आता केवळ नऊच दिवस

**परभणी ,/प्रतिनिधी-** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीतील लढतीचं चित्र स्पष्ट झाल्याबरोबर प्रमुख राजकीय पक्षांच्या प्रबळ उमेदवारांसह अन्य पक्ष व बंडखोर उमेदवारांनी दहा दिवसांचा अल्प कालावधी ओळखून स्वतःस प्रचारयुध्दात जूंपले आहे.

शुक्रवार २ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज माघारीकरीता राजकीय पक्षांच्या नेतेमंडळींसह त्या त्या प्रभागातील प्रबळ उमेदवारांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. त्यात काहींना यश मिळाले, तर काहींच्या पदरात अपयश पडले. परंतु, लढतीचं चित्र लगेचच स्पष्ट झाले. त्यामुळे त्या त्या प्रभागातील प्रबळ उमेदवारांनी तात्काळ प्रत्यक्ष लढतीवर लक्ष केंद्रीत केले.

निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर काही दिवसांपासून प्रबळ उमेदवार व त्यांचे समर्थक प्रचारयुध्दावर जूंपले होते. परंतु, प्रत्यक्ष लढतीचं चित्र स्पष्ट झाल्याबरोबर या प्रबळ उमेदवारांनी कुटूंबातील साऱ्या सदस्यांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सुपूर्त केल्या. स्वतःची प्रचार यंत्रणा तसेच सौभाग्यवती असो किंवा मुलांच्या स्वतंत्र प्रचार यंत्रणा बांधणीचा प्रयत्न सुरु केला. काही उमेदवारांनी त्यांचे नाते-गोते, सगे-सोयरे व मित्र परिवारांना पाचारण करीत त्यांच्याद्वारेही स्वतंत्र प्रचार यंत्रणा उभारण्याचा



प्रयत्न सुरु केला. या व्यतिरिक्त मतदार यादीची छाननी, त्यातील अनुकूल असणारे मतदार, आग्रह केल्यानंतर मिळू शकणारे मतदान किंवा न मिळणारेही मतदान या गोष्टीचाही या प्रबळ उमेदवारांनी अंदाज घ्यावयास सुरुवात केली. बाहेरगावी असणाऱ्या मतदारांना मतदानाकरीता परभणीत कसं आणता येईल, या दृष्टीनेही प्रयत्नांची पराकाष्टा सुरु केली. त्यासाठी खास यंत्रणा उभारुन बाहेरगावी असणाऱ्या मतदारांशी संपर्क साधण्याचा, त्या ठिकाणी स्वतंत्र अशी कार्यकर्त्यांची फळी उभारण्याचा प्रयत्न सुरु केला.

प्रचार साहित्य तसेच जाहीरनामे, परिचयनामे व आजपर्यंत केलेल्या कामांचा आढावा असणाऱ्या पुस्तिका तातडीने बाहेर काढल्या व हे साहित्य सर्वसामान्य मतदारांपर्यंत पोहोचविण्याकरीता व्यूहरचना सुरु केली. त्याचबरोबर आपल्या खास कार्यकर्त्यांबरोबर या प्रबळ इच्छुकांनी शुक्रवारी संध्याकाळपासून गुफ्तगू सुरु केले. या निवडणूका सोप्या नाहीत, या लढती अत्यंत अटीतटीच्या आहेत, तूल्यबळ आहेत. त्यामुळे कोणीही कोणत्याही आत्मविश्वासात वावरु नका, हे दहा दिवस महत्वाचे आहेत. डोअर टू डोअर प्रचार केल्याशिवाय पर्याय नाही, अशा सक्त सूचना या प्रमुख उमेदवारांनी आपआपल्या कट्टर समर्थकांना दिल्या. तसेच पॅनल टू पॅनलच मतदान मागा, असेही आवर्जून नमूद केले.

या प्रबळ उमेदवारांनी सोशल मिडीयासह अन्य पर्यायाच्या माध्यमातून सामान्य मतदारांपर्यंत पोहोचण्याकरीता अन्य कसरती करण्याचाही प्रयत्न सुरु करण्यास प्रारंभ केला आहे.

# भाजपकडून २२ पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी

## पक्षशिस्तीचा भंग केल्याचा ठपका

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ४ जानेवारी :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक-२०२६च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक शिस्तीबाबत कठोर भूमिका घेत २२ पदाधिकाऱ्यांची प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांवरून हकालपट्टी करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या प्रतिमेला धक्का पोहोचवणाऱ्या कार्यपद्धती व पक्षशिस्तीच्या उल्लंघनाच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पक्षाच्या अधिकृत बैठकीत या प्रकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित पदाधिकाऱ्यांकडून पक्षाची धोरणे, निर्णय व शिस्त यांचे पालन अपेक्षित असताना त्यांच्या कार्यपद्धतीमुळे संघटनात्मक शिस्तीला बाधा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पक्षहित लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असून तो तात्काळ लागू करण्यात आला आहे.

हकालपट्टी करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये श्रीकांत घुले, कुणाल मराठे, तेजस व्यवहारे, गीता आचार्य, राजेंद्र वाहुळे, बळीराम कदम, प्रशांत भदाणे पाटील, मदन काका नवपुते, गणेश गरंडवाल, अरविंद डोणगावंकर, राजू खरे (जवाहरलाल बन्सी खरे), सुदाम साळुंके, प्रमोद नरवडे, संकेत प्रधान, श्री. भंडारी, देवयानी सिमंत, प्रमोद दिवेकर, राजश्री पगार, संतोष धुमाळ पाटील, सौ. आरती गुटलकर, सौ. रितु अग्रवाल आणि राहुल चाबुस्कवार यांचा समावेश आहे. शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी जारी केलेल्या प्रेस नोटमध्ये पक्षशिस्त, धोरणात्मक स्पष्टता आणि संघटनात्मक नियंत्रण याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा ठाम संदेश देण्यात आला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक मजबूत, शिस्तबद्ध आणि उद्दिष्ट केंद्रित ठेवण्यासाठीच ही कारवाई करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात...

### दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले जयंती



**बिडकीन :** पैठण तालुक्यातील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी शाळेचे संस्थापक प्रकाश जैस्वाल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भाषणाद्वारे सावित्रीबाईंच्या जीवनाविषयी माहिती सांगितली. सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शाळेत फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन ठेवण्यात आली होती. यावेळी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांची वेशभूषा करुन आले होते. तसेच आर्मी पोलीस विविध फळे, फुले, पालेभाज्या यांचा पोशाख करुन विद्यार्थी आलेले होते. कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापिका दर्शना कोकणे तसेच सुनिता चव्हाण, दिक्षा साबळे, नितीन मोरे, शितल कुमावत, नैना कहार, पल्लवी औटी, सीमा वंजारे यांनी परिश्रम घेतले.

### भगवती विद्यालयात क्रंतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती




**बिडकीन :** पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय, बिडकीन येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिवस म्हणून साजरी करण्यात आली. प्रथम विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक रायभान रत्ते तसेच दहावी विद्यार्थी प्रतिनिधी बुशेरा शेख, नव-वीची ची प्रतिनिधी राजकन्या मंडाळ यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापकांनी त्यांच्या खडतर जीवनातून श्रिमुक्तीची बाग त्यांनी फुलवून सर्वांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ धनवे यांनी तर आभार कमलाकर काळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी श्रीधर जऱ्हाड, सुनील पवार, अप्पासाहेब किसवे, विश्रांती सलगरे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले.

### किया इंडियाकडून ऑल-न्यू किया सेल्टोस लाँच

**नवी दिल्ली :** किया इंडियाने आज ऑल-न्यू किया सेल्टोसच्या किमतींची घोषणा केली, ज्यासह मिड-एसयूव्ही श्रेणीमध्ये आपले स्थान प्रबळ केले आहे आणि ग्राहकांना त्यांची आवडती एसयूव्ही १०.९९* लाख रूपयांपासून (एक्स-शोरूम) सुरू होणाऱ्या किमतीमध्ये खरेदी करण्याची आकर्षक संधी दिली आहे. अधिकाधिक ग्राहकांसाठी सेकंड-जनरेशन, अधिक मोठी, अधिक आकर्षक आणि अधिक प्रगत एसयूव्ही परवडणारी करत कियाने मापदंड उंचावत या श्रेणीला नव्या उंचीवर नेले आहे. ऑल-न्यू किया सेल्टोसने भारतातील आधुनिक कुटुंबांसाठी आणि एसयूव्ही ग्राहकांसाठी सर्वात परिपूर्ण व लक्षवेधक निवड म्हणून आपले स्थान अधिक प्रबळ केले आहे. या एसयूव्हीमध्ये ऐसपैस जागा, आकर्षक नवीन डिझाइन, सुरक्षितता व तंत्रज्ञान आहे, तसेच ही एसयूव्ही आकर्षक दरामध्ये येते.

### जुनी परंपरा आणि तिळगुळ खाण्यामागील आरोग्यशास्त्र

**छत्रपती संभाजीनगर :** मकर संक्रांतीला सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. यामुळे दिवस मोठे होऊ लागतात, शरीरात नवी ऊर्जा येते आणि हळूहळू थंडी कमी होऊ लागते. परंपरेनुसार, या ऋतूबदलाच्या काळात शरीर गरम ठेवणारे, रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे आणि एकूण आरोग्यास पूरक असे अन्न खाणे योग्य मानले जाते. तिळ आणि गुळ यांचे पारंपरिक मिश्रण यासाठी अतिशय उपयुक्त आहे.वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथील चीफ डायटिशियन स्वाती अवस्थी सांगतात की, तिळ हे नैसर्गिकरित्या उष्णता निर्माण करतात आणि त्यामध्ये चांगले फॅट्स असतात. त्यामुळे शरीर उबदार राहते, सांध्यांचे आरोग्य सुधारते आणि थंडीत ऊर्जा टिकून राहते. गुळामध्ये लोह, झिंक आणि मॅग्नेशियमसारखी महत्त्वाची खनिजे असतात, जी रोगप्रतिकारशक्ती वाढवतात आणि हंगामी आजारांचा धोका कमी करतात.रोगप्रतिकारशक्तीव्यतिरिक्त तिळ-गुळ त्वचा आणि केसांसाठीही खूप फायदेशीर आहे.

# 'दिनी इज्तिमा'साठी हजारो हात सरसावले

## अजिंठा येथे हजारोच्या संख्येने मुस्लिम बांधवांनी केली प्रार्थना

**तभा वृत्तसेवा,**

**अजिंठा, दि. ४ जानेवारी :** सिल्लोड तालुक्यातील अजिंठा येथील गावखेद परिसरात आयोजित दोन दिवसीय दिनी इज्तिमा चा शनिवारी २ जानेवारी रोजी दुपारी सामूहिक प्रार्थनाने समारोप झाला. विविध जिल्ह्यातील तसेच सिल्लोड तालुक्यातील अजिंठा, शिवणा, गोळेगांव, अंभई, जमभई, चारनेर, भराडी आदी भागातील

हजारो मुस्लिम बांधव या धार्मिक कार्यक्रमासाठी उपस्थित होते. संपूर्ण इज्तिमा कालावधीत कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्धपणे पार पडले. छ. संभाजी नगर येथील अमिर -मौलाना शमशुद्दीन मौलाना शेख नूर सहाब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. या इज्तिमाची तयारी सुमारे पंधरा ते वीस दिवसापासून सुरू होती. सुमारे दोन ते तीन एकर क्षेत्रात मंडप उभारण्यात आला होता. त्यासोबत प्रकाशयोजना, पिण्याचे पाणी,



स्नानगृह, वजुखाने, स्वच्छतागृहे, भोजन व्यवस्था, दवाखाना मेडिकल आणि वाहनतळ यांचे काटेकोर नियोजन करण्यात आले.

फज्रची नमाज झाल्यानंतर इज्तिमाची औपचारिक सुरुवात झाली. छ. संभाजी नगर, मुंबई पुणे या भागांतून आलेल्या उलेमांनी उपस्थितांना हजरत मुहम्मद (स.) यांनी दाखवलेल्या मार्गावर चालत सदाचार आणि सामाजिक सलोखा यांचे महत्त्व सांगितले. समारोप प्रसंगी मौलाना शमशुद्दीन सहाब यांनी सामूहिक प्रार्थना केली.

यावेळी नमाज व धार्मिक आचरणात सातत्य ठेवत शांतता जोपण्याचा संदेश देण्यात आला. दरम्यान सायंकाळी दुवा सजीव सृष्टी, बंधूभाव, एकता अखंडता राहावा,ईश्र्वराला प्रार्थना करण्यात आली. यावेळी हजारो चे संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते. इज्तेमाचा समारोप करण्यात आला.

# बिडकीन डीएमआयसी प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन स्थगित



**तभा वृत्तसेवा,**

**बिडकीन, दि. ४ जानेवारी :** दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॅरिडर साठी बिडकीन नांदलगाव बन्नी तांडा बंगला तांडा निलजगाव आध गावांची गावातील शेतकऱ्यांची जमीन २०१३ मध्ये संपादित केली होती. मात्र शेत जमीन संपादित झाल्यानंतरही प्रकल्पग्रस्तांच्या अनेक मागण्या रखडलेल्या होत्या. दि. २ जानेवारी रोजी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी डीएमआयसी कार्यालयास कुलूप ठोकून प्रशासन विरोधी आंदोलन पुकारले होते. विशेष म्हणजे या आंदोलनास आमदार विलास भुमरे यांनीही शेतकऱ्यांसोबत केली होती. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी १ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठक घेऊन डीएमआयसी प्रकल्पग्रस्तांच्या सर्व मागण्या ऐकून घेतल्या. त्या सर्व रास्त असल्यामुळे त्यांनी मी स्वतः या सर्व मागण्या कुठलाही कालावधी न सांगता लक्ष घालून सोडून देईल. त्यांच्या आश्वासनावर आंदोलन स्थगित केले.



# परमपूज्य नियमसागर महाराज अवतरण दिवस उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ४ जानेवारी :** पार्श्र्वनाथ ब्रह्मचर्य जैन गुरुकुल, वेरूळ येथे परम पूज्य आचार्य विद्यासागर महाराजांचे परम शिष्य निर्यापक मुनिश्री नियमसागर महाराज यांचा अवतरण (जन्मदिन) दिवस गुरुवारी नियोजनबद्ध व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सहा महिन्यांच्या वार्षिक चातुर्मासाच्या यशस्वी समारोपानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबईचे प्रशांत जैन होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सुहास शहा, मोनिका शहा, संदीप भुरे, योगिता भुरे, उद्योजक विजय पाटणी, सुनंदा पाटणी, आमदार प्रशांत बंब, सतीश संगई, परिमल रुईवले, सुहास चवरे, प्रमोद चवरे, राजाभाऊ डोणगावकर, उद्धर चवरे आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या वतीने सर्वांचा औपचारिक सत्कार करण्यात आला.

पदप्रक्षालनाचा मान आमदार प्रशांत बंब व डॉ. सुहास शहा यांना मिळाला. सुनंदा पाटणी यांनी गुरुकुलसाठी पाच लाख रुपयांचे दान जाहीर केले. प्रवचनात नियमसागर महाराज यांनी फास्ट फूडचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम अधोरेखित करत आजीवन त्यागाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीष भैय्या यांनी केले.अशी माहिती अतुल बादे नरेंद्र अजमेरा पियश कासलीवाल यांनी दिली .

# भारतातील नंबर एक; बुलडाणा अर्बनबाबत अफवा

## संस्थेची आर्थिक स्थिती अत्यंत मजबूत; सभासदांनी घाबरू नये - संस्थेचे स्पष्ट आवाहन

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.४ जानेवारी :** भारतातील नंबर एक सहकारी पतसंस्था म्हणून ओळखली जाणारी बुलडाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ही आपल्या सभासदांची विश्वासू आर्थिक साथीदार आहे. सध्या संस्थेबाबत पसरवण्यात येत असलेल्या अफवा पूर्णतःनिराधार असून, संस्थेची आर्थिक स्थिती अत्यंत मजबूत असल्याचे संस्थेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.गेल्या काही दिवसांत मराठवाड्यातील काही शाखांमध्ये सोने तारण कर्ज सोडवण्यासाठी सभासदांची गर्दी दिसून आली.यामागे कर्नाटकमधील एका साखर कारखान्याशी संबंधित खोट्या अफवा असल्याचे पुढे आले आहे.मात्र,सभासदांचे सोने पूर्णपणे सुरक्षित असून शासनाकडून संस्थेवर कोणतेही निर्बंध घालण्यात आलेले नाहीत.ग्रामीण भागात खासगी सावकारीला आळा घालण्यासाठी भारतातील नंबर एक बुलडाणा अर्बनने मोठ्या प्रमाणावर शाखांचे जाळे उभे केले आहे.लग्न, शिक्षण,वैद्यकीय,व्यावसायिक व सामाजिक गरजांसाठी संस्थेने लाखो सभासदांना वेळेवर आर्थिक मदत दिली आहे.अफवांमुळे झालेल्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर संस्थेने काही शाखा रात्रभर सुरू ठेवून सभासदांना सोने सोडविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली.



सिल्लोड येथील विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांनी दैनिक तरुण भारतच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की आमची शाखा रविवारी ही पण चालू होती आणि नेहमीप्रमाणे चालू राहणार आहे. तरी सर्व सभासदांनी कोणत्याही अफेवर विश्र्वास ठेवू नका बुलडाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी आपल्या सेवेत नेहमीप्रमाणे हजर राहणार आहेत असे दळवी यांनी सांगितले.

**बुलडाणा अर्बन-आर्थिक बळ**

एकूण ठेवी : १५,००० कोटी, सोने तारण व वेअरहाऊस कर्ज : ५००० कोटी, वेअरहाऊस कर्ज : १,५०० कोटी, संस्थेचा बॅलन्स : ४,००० कोटी, स्वमालकीची मालमत्ता : ३७३ गोदामे, ९ कोल्ड स्टोअरेज, ४ भक्तनिवास, ४७६ शाखा, २२ शाळा.

गेल्या ४० वर्षांपासून भारतातील नंबर एक बुलडाणा अर्बन ही संस्था लाखो सभासदांचा विश्वास जपत आर्थिक व सामाजिक सेवा पुरवत आहे. सभासदांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास न ठेवता संस्थेच्या अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे,असे आवाहन संस्थेने केले आहे.

# जि.प. प्राथमिक शाळेत सावित्रीबाई फुले जयंती व बालिकादिन

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.४ जानेवारी :** शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन हा संदेश देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे शनिवार रोजी प्रेरणादायी व उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याच दिवशी बालिकादिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्त्री शिक्षणाची ज्योत पेटविणाऱ्या सावित्रीबाईंच्या कार्याचा वारसा आजच्या शाळेतील विदयार्थीनी पुढे नेतील असा भावनिक संदेश यातुन देण्यात आला. कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष राजू कुडके, शालेय समिती सदस्य योगेश बोखारे, शंकर जेठे, वैशाली पवार, मनीषा जेठे, गिोपाल चौधरी उपस्थित होते.




# 'टेडएक्स एमजीएमयु २०२६'मध्ये विचारमंथन

**छत्रपती संभाजीनगर, दि. ४ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने



आयोजित 'टेडएक्स एमजीएमयु २०२६' हा कार्यक्रम रुक्मिणी सभागृहात उच्च-ऊर्जा, प्रेरणादायी आणि बौद्धिक मूल्यवर्धन करणाऱ्या वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून आणि नेतृत्वाखाली साकारलेल्या या उपक्रमाची संकल्पना 'इंबर : वन स्पार्क, एंडलेस पॉसिबिलिटीज' अशी होती. एका ठिणगीतून अमर्याद शक्यता निर्माण होतात, या विचारधारेवर आधारित या व्यासपीठावर देशभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आपले अनुभव, दृष्टिकोन आणि नवोपक्रमात्मक विचार प्रभावीपणे मांडले.

कार्यक्रमात एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, पद्मश्री प्रा. जी. डी. यादव, दिग्गज गोल्फपटू अमित लुथरा, सिस्टिम्स थिंकर नैना साहनी, बिझनेस लीडर कल्पेन शुक्ला, सामाजिक कार्यकर्त्या दीक्षा दिंडे, ग्राफिक डिझायनर व उद्योजक अमोल सुतार, सुप्रसिद्ध शेफ पूनम कौर बिंद्रा, शेतकरी-उद्योजक सिद्धेश साकोरे आणि अवकाश तज्ज्ञ डॉ. शिरीष रावण यांनी विचार मांडले.

अंकुशराव कदम यांनी एमजीएमच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या मल्टी-लोकेशन, मल्टी-डोमेन प्रवासाचा आढावा घेत विपश्यनेचे महत्त्व अधोरेखित केले. पद्मश्री प्रा. जी. डी. यादव यांनी जैवतंत्रज्ञान, नॅनोटेक्नॉलॉजी, 'वेस्ट टू वेल्थ' आणि विज्ञान-आध्यात्म समन्वयातून शाश्वत विकास साधण्याचा रोडमॅप मांडला. अमित लुथरा यांनी गोल्फमधील संघर्षातून मिळालेली जिद्द आणि 'दि गोल्फ फाउंडेशन'द्वारे खेळाचा सामाजिक विस्तार स्पष्ट केला. नैना साहनी यांनी इनर रेग्युलेशन आणि रिलेशनल कोहेरन्सच्या माध्यमातून परिवर्तनाची ब्लूप्रिंट मांडली.

कल्पेन शुक्ला यांनी दुर्मिळ आजाराशी लढ्याचा अनुभव शेअर केला. दीक्षा दिंडे व अमोल सुतार यांनी 'इन्क्लुजन यात्रे'तून दिव्यांगांसाठी सर्वसमावेशक पायाभूत सुविधांची गरज अधोरेखित केली. पूनम कौर बिंद्रा यांनी पारंपरिक, पौष्टिक आहाराच्या व्यवसायिक स्केलेबिलिटीवर भर दिला. सिद्धेश साकोरे यांनी कृषी नवोपक्रम व शेतकरी सक्षमीकरणाचा प्रवास मांडला. डॉ. शिरीष रावण यांनी अवकाश तंत्रज्ञानाद्वारे आपत्तीपूर्वानुमान व शाश्वत विकासावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमास खासदार डॉ. कल्याण काळे, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, टेडएक्स एमजीएमयुच्या लायसेन्सी व प्राचार्या डॉ. विजया मुसांडे यांच्यासह एमजीएम परिवार, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्या डॉ. विजया मुसांडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सारंगा नवल, प्रा. सुखवंत कौर आणि विद्यार्थ्यांच्या टीमने कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावली.

# बिडकीन ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**

**बिडकीन दि ४ जानेवारी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला




शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल मध्ये ७ वे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे होते डॉ. वेंकट मैलापुरे, तर विशेष पाहुणे म्हणून बिडकीन सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके उपस्थित होते.

संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला यांनी प्रमुख पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. स्नेहसंमेलनाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून झाली. स्वागतगीत आणि शब्दसुमनांनी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. भारतीय परंपरेनुसार श्री गणेशस्तुतीने कार्यक्रमाचा शुभारंभ केला.डॉ. वेंकट मैलापुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, शिक्षणासोबत शिस्त, संस्कार आणि मेहनतीची सवय अंगी बाणवणे गरजेचे आहे. स्वप्ने मोठी पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा.

सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी पालक व विद्यार्थ्यांना सांगितले, मुलांसमोर नकारात्मक बोलणे टाळा. सकारात्मक संवाद ठेवा. चांगल्या सवयी, शिस्त आणि नियमांचे पालन केल्यास यश निश्चित मिळते. शिक्षक दत्तात्रय चेडे यांनी शाळेच्या उद्दिष्टांचा आढावा घेत सांगितले. स्नेहसंमेलनात विद्यार्थी, शिक्षक, पालक, पत्रकार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात आर. के. नायर, ए. पी. जे. अब्दुल कलाम, बाबासाहेब आंबेडकर, तीजनबाई, कैलाश सत्यार्थी, तुकाराम ओम्बले, राजेंद्र कौशिक, अभिनंदन वर्धमान, मुरलीकांत पेटकर, सॅम मानेकशॉ, दशरथ मांझी, सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन करण्यात आले. इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य आणि लाईफ ऑफ कैलाश सत्यार्थी, लाईफ ऑफ तीजनबाई या नाट्यप्रयोगांनी उपस्थितांचे मन जिंकले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक वर्षा चव्हाण, काजल देशमुख, दिपाली हनवते, सोनाली खोंड, प्रमोद शिंदे, नवनाथ बांगर, रमेश, प्रकाश करोडीवाल, कृष्णा भालेराव, दत्तात्रय चेडे, ज्ञानेश्वर चव्हाण, हर्षद देविदास तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शिक्षक व विद्यार्थी समितीने केले, आभार प्रदर्शन शिक्षिका प्रतिक्षा पोटे यांनी केले.

# हिंगोली पोलिस सायबर सेलच्यातर्फे सायबर गुन्हे जनजागृती कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जानेवारी**

भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या डीईएपी अंतर्गत धन फाऊंडेशन आणि पोलिस सायबर सेलच्यावतीने रविवारी आर्थिक व सायबर सुरक्षितेबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

येथील एका खाजगी हॉटेलच्या सभागृहात या कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला बँक अधिकारी, एलडीएम शाखा व्यवस्थापक, एफएलसी समन्वयक यांच्यासह सायबर सेल यांच्यावतीने सायबर गुन्ह्यांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. ऑनलाईन फसवणूक, स्कॅम, बनावट फोन कॉल, सोशल मिडीया हॅकींग, ऑनलाईन नोकरी व कर्ज फसवणूक याबाबत सविस्तर माहीती देण्यात आली. सायबर गुन्हे कसे घडतात, त्यापासून स्वत: चे संरक्षण कसे करावे तसेच सायबर फसवणूक झाल्यास त्वरीत काय उपाययोजना कराव्यात, यावर मार्गदर्शन करण्यात आले.

तत्काळ लोण उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखविणारे ॲप्स हे फ्रॉड ॲप्लीकेशन असू शकतात. ऑनलाईन विवाह नोंदणी साईटवर अनेकदा फसवणूक होणारी माहीती असू शकते त्याबद्दल योग्य ती खात्री करावी तसेच ऑनलाईन बचत मध्ये कमी पैसे गुंतवून जास्त फायदा दाखवत असल्यास तो फ्रॉड असण्याची शक्यता असेते. आरटीओ ईचलान, सस्नेह निमंत्रण, पी एम किसान योजना अशा प्रकारचे एपीके फाईल हे डाऊनलोड करू नये अन्यथा मोबाईल हॅक होऊन आर्थिक फसवणूक होऊ शकते. तसेच पोलिस अधिकारी आहे असे भासवून डिजीटल अरेस्ट करून पैशाची मागणी केल्यास सदर नंबर तत्काळ ब्लॉक करावा तसेच आर्मीचे अधिकारी असून जूने फर्निचर कमी किंमतीत विकणे आहे अशा प्रकारचा मॅसेज आल्यास तो खोटा असून त्याद्वारे फसवणूक होण्याची शक्यता असते.

फसवणूक झाल्यास तक्रार करण्यासाठी १९३० हेल्पलाईन तसेच मोबाईल हरवल्यास सीईआयआर पोर्टलवर आपली तक्रार नोंदवावी याची प्रत्यक्ष माहीती देण्यात आली. वेळेत तक्रार दिल्यास आर्थिक नुकसान टाळता येऊ शकते. सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहीले पाहीजे तसेच यावर जनजागृती हाच बचावाचा मार्ग आहे.

सदरील कार्यक्रम पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, अंमलदार दत्तात्रय नागरे, ईरफान पठाण, मारोती काकडे, प्रदीप झुंगरे, प्रणीता मोरे यांनी घेतला. कार्यक्रमाला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# उपजिल्हा रूग्णालयात बजेटअभावी डायलेसीस युनीट रखडले

## गरजू किडनी रूग्णांची होतेय गैरसोय



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ४ जानेवारी**

येथील उपजिल्हा रुग्णालयासाठी डायलेसीस युनीट सुरू करण्यासाठी मशीनची ऑर्डर देण्यात आली असली, तरी युरोपीयन देशातून येणाऱ्या या मशीन गेल्या दीड वर्षापासून उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यातच आरोग्य विभागाच्या डायलेसीस सिस्टीमसाठी आवश्यक बजेट उपलब्ध नसल्याने गरजू व गरीब किडनी रुग्णांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत.

उप जिल्हा रुग्णालयात इतर सर्व सुविधा रुग्णालय प्रशासनाने उपलब्ध करूण ठेवल्या आहेत.

मागील एक वर्षांपासून वसमत येथील पत्रकार मोईन कादरी यांनी संबंधित कंपनीचे मॅनेजर तसेच उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक यांच्याशी संपर्क साधून व सातत्याने पाठपुरावा करत आहेत मात्र, प्रत्येक वेळी केवळ कारणे व आश्वासनेच मिळत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

एकीकडे आमदार, खासदार निवडणुकीच्या रणधुमाळीत कोट्यवधी रुपये खर्च करत असताना, दुसरीकडे गरीब व गरजू रुग्णांसाठी आवश्यक असलेल्या डायलेसीस युनिटसाठी संबंधित कंपनीला शासनाकडून बजेट उपलब्ध करून दिले जात नसल्याने किडनी आजारग्रस्त रुग्णांची हेळसांड सुरू आहे. वसमत येथील एक सामाजिक जाणिवेचा नागरिक स्वतः सह इतर रुग्णांसाठी वारंवार संबंधितांशी दूरध्वनीवर संपर्क साधत आहे. मात्र बजेटअभावी व मशीन भारतात उपलब्ध नसल्याने संबंधित यंत्रणा हतबल झाल्याचे चित्र आहे. आरोग्य विभागाच्या मंत्र्यांनी या गंभीर समस्येची तात्काळ दखल घेऊन निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच लोकप्रिय लोकप्रतिनिधींनी थोडा वेळ काढून पुढाकार घ्यावा, अशी जोरदार मागणी गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांकडून करण्यात येत आहे. वसमतचे डायलेसीस युनिट लवकरात लवकर सुरू न झाल्यास रुग्णांचे हाल अधिकच वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

# महिलांनी सावित्रीबाई फुलेंची त्याग लक्षात ठेवावा- इतिहास अभ्यासक राजकुमार कऱ्हाळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जानेवारी**

महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी समाजासाठी केलेला त्याग अतुलनीय आहे. प्रस्थापित समाजाचा विरोध पत्करून त्यांनी शिक्षणाचे पवित्र कार्य सुरू ठेवले. पुण्याच्या भिडेवाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून सर्व जाती-धर्मांच्या मुलींना शिक्षणाची दारे खुली केली. महिलांनी सावित्रीबाई फुलेंचा त्याग लक्षात ठेवावा असे प्रतिपादन प्रमुख वक्ते इतिहास अभ्यासक राजकुमार सोपानराव क-हाळे यांनी केले.

कळमनुरी येथील शारदा प्राथमिक व माध्यमिक विद्या मंदिर येथे बाबु जगजिवनराम राष्ट्रीय प्रतिष्ठान, नवी दिल्ली तसेच बैहरोनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, कळमनुरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख वक्ते इतिहास अभ्यासक राजकुमार सोपानराव क-हाळे पुढे बोलतांना म्हणाले की, अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाचा समावेश केला, रात्रशाळा सुरू केल्या तसेच सतीप्रथा, केशवपन व बालविवाहास कडाडून विरोध केला. दुष्काळी परिस्थितीत ५२ ठिकाणी अन्नछत्रे चालवून त्यांनी समाजसेवेचा आदर्श घालून दिला.आजच्या बदलत्या काळात महिलांनी विविध क्षेत्रांत मोठी प्रगती केली असून व्यसनांपासून दूर राहून सामाजिक कार्य करावे, असे आवाहनही करत सावित्रीबाई फुले यांचा त्याग कायम लक्षात ठेवावा असे सांगितले.



यावेळी नगराध्यक्षा सौ.अश्लेषा चौधरी, विस्तार अधिकारी बालाजी गोरे, गोविंदराव क-हाळे यांनीही मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे उद्घाटन कळमनुरीच्या नवनियुक्त नगराध्यक्षा सौ.अश्लेषा चौधरी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शेषराव क-हाळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्षा सुवर्णा ताई गाभणे, नगरसेविका सौ. अर्चना सतीश खर्जुले, नगरसेवक गंगाधर बेले, कवी शिवाजी क-हाळे,गोविंदराव क-हाळे, बालाजी क-हाळे, दीपक गेडाम,ओमप्रकाश श्रीलेले, राजेश शेळके, नारायण काळुशे,अशोकराव आनेवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर ढोणे यांनी केले. सूत्रसंचालन गजानन तांबिले यांनी तर आभार प्रदर्शन संस्था सहसचिव बालाजी क-हाळे यांनी केले. कार्यक्रमास शारदा प्राथमिक व माध्यमिक विद्यामंदिर व केंद्रीय महात्मा फुले शाळेचे शिक्षक,विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### कैलास पडोळे यांचा सेवापूर्ती सोहळा

हिंगोली- सेनगाव येथील तोष्णीवाल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय सहाय्यक म्हणून २८ वर्षापासून कार्यरत असणारे कैलास पडोळे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, सत्कारमूर्ती कैलास पडोळे, सौ. मीरा पडोळे, ग्रंथपाल प्रोफेसर आर. आर. पैठणकर आदी मंडळी उपस्थित होती. सत्काराला उत्तर देताना कैलास पडोळे (ग्रंथालय सहाय्यक) यांनी महाविद्यालया प्रती ऋण व्यक्त करत ओळख देणाऱ्या संस्थेविषयी आ जन्म स्नेह राहणार यात कोणतेच दुमत नाही अशी भावना व्यक्त केली, तसेच उर्वरित आयुष्य समाजाची सेवा करण्याची इच्छा बोलून दाखविली. प्राचार्य डॉ. तळणीकर यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी ग्रंथालय व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी अत्यंत नेटाने पार पाडली.जो महाविद्यालयाचा आत्मा म्हणून पाहिला जातो. महाविद्यालयातील वक्तशीर कर्मचारी म्हणून उल्लेख करत भावी आयुष्यास सदिच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. टी. यु.केंद्रे यांनी तर आभार डॉ. आर. ए.जोशी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेकोट्याभोवती तरूण मोबाईलमध्ये गुंग



हिंगोली- जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी घट झाली असून, शहरात गारवा प्रचंड वाढला आहे. बोचऱ्या वाऱ्यामुळे नागरिक हैराण झाले असून, ठिकठिकाणी थंडीपासून बचाव करण्यासाठी शेकोट्या पेटवल्या जात असल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे, शहरातील गल्लीबोळांत आणि मुख्य चौकांत रात्रीच्या वेळी युवक एकत्र जमून शेकोटीचा आधार घेत आहेत. मात्र, या शेकोटीभोवती गप्पा रंगण्याऐवजी बहुतांश तरुण आपल्या मोबाईलमध्ये गुंग असल्याचे पाहायला मिळत आहे. थंडीचा कडाका वाढल्याने रात्री लवकरच रस्ते ओस पडत असून, केवळ शेकोटीच्या उजेडात बसलेले तरुणांचे जत्थे लक्ष वेधून घेत आहेत. वातावरणातील या बदलामुळे गरम कपड्यांच्या बाजारपेठेतही मोठी गर्दी होऊ लागली आहे.

### वसमतमध्ये जुगार अड्डयावर धाड

हिंगोली- वसमत शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात एका जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकीत १९५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. सदरची कामगिरी सपोनि शिवसांब घेवारे, भुजंग कोकरे, गजानन पोकळे, आकाश टापरे आदींनी केली.

# हट्टा महाविद्यालयातील विद्यार्थ्यावर तिघांचा चाकूने हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जानेवारी**

वसमत तालुक्यातील हट्टा येथील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्यावर दुचाकीवर आलेल्या तिघांनी चाकूने हल्ला करीत त्यास गंभीर जखमी केले असून विद्यार्थ्यावर परभणी येथील रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कळमनुरी तालुक्यातील वारंगा येथील वैभव शिरसाट हा हट्टा येथील महाविद्यालयात शिक्षण घेतो. शनिवारी महाविद्यालयातील वर्ग आटोपून तो सायंकाळी साडेपाच वाजता खोलीवर निघाला होता. यावेळी दुचाकीवर तिघेजण आले. त्यांनी साई अपार्टमेंट समोरील रस्त्यावर वैभववर चाकूने हल्ला केला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे वैभव घाबरून गेला. हल्लेखोरांनी वैभवर वार करून गंभीर जखमी केले. त्यानंतर हल्लेखोर चाकू फेकून देत दुचाकीवर पसार झाले.

या घटनेची माहीती मिळताच हट्टा पोलिस ठाण्याचे सपोनि संग्राम जाधव यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जखमी वैभवला रूग्णवाहीकेतून परभणीच्या शासकीय रूग्णालयात दाखल केले. त्याठिकाणी त्याच्यावर उपचार सुरू करण्यात आले आहेत.

याप्रकरणी कार्तिक जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार हट्टा पोलिस ठाण्यात आरोपीमहेश ढोरे व इतर दोन साथीदार यांच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तू माझ्या गर्लफ्रेंडशी का बोलतोस या कारणावरून आरोपींनी वैभव क्षीरसागर याच्यावर जीवघेणा हल्ला केला. या घटनेनंतर तीनही आरोपी फरार झाले असून त्यांच्या शोधासाठी हट्टा पोलिसांचे पथक रवाना करण्यात आले आहे. आरोपींना अटक केल्यानंतरच या घटनेमागील पार्श्वभूमी स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे. आरोपीमध्ये एक वसमत तालुक्यातील, एक परभणी जिल्ह्यातील तर एकजण नांदेड जिल्ह्यातील असल्याची माहीती पोलिसांना मिळाली आहे.

# हिंगोली येथे राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पुण्यतिथी साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जानेवारी**

येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने जिनमाता नगर गणपती मंदिर समोर राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या पुण्यतिथीच्या कार्यक्रमप्रसंगी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे एकनाथराव कुटे, संजय बांगर, प्रा.संजय चाटे, गोपाल बांगर, राजकुमार मोरगे, प्राचार्य, पंडितराव शिंदे, प्रा. गुणाजी नलगे, प्रा.मुरलीधर जायभाये, प्रा. सुधीर वाघ, डॉ.भीमराव मुंडे, नागरे, अशोक लव्हारे, उमेश कुटे, राहुल घुगे शिवाजीराव घुगे, पंडितकर, सुधाकर गंगावणे, दत्ता कुटे, मनोज कायदे, गोविंद कागणे, राहुल घुगे, निवास कुटे, देविदासराव घुगे, संतोष दराडे, राजु घुगे, गजानन सांगळे, संतोष राठोड, उमेश कुटे, राहुल घुगे, संतोष दराडे, सुधाकर गंगावणे, दत्तराव कुटे, गोविंद कांगणे, मुंडे तसेच शहरातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी एकनाथराव कुटे यांनी संत भगवान बाबा हे आध्यात्मिक क्रांतीसह सर्व मनुष्यमात्रांना शैक्षणिक उंची मिळावी यासाठी बाबा अहोरात्र झिजले. सूत्रसंचालन राजकुमार मोरगे यांनी तर आभार प्रदर्शन गोपाल बांगर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या पदाधिकारी परिश्रम घेतले.

# अवैध दारू वाहतुक करणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केले जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जानेवारी**

अवैध दारूची वाहतुक करीत असल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाल्यानंतर पथकाने नर्सी नामदेव ते सेनगाव रस्त्यावर एका दुचाकीस्वाराला अवैध दारूसह जेरबंद करीत ६१ हजार ५२० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार स्थागुशाचे पोउपनि दिलीप मोरे व नर्सी नामदेव पोलिस हद्दीत पेट्रोलिंग करीत अवैद्य धंद्याची माहिती काढून कार्यवाही करण्यासाठी गोपनीय माहिती घेत असतांना गोपनीय बातमीदाराकडून गोपनीय माहिती मिळाली की नर्सी ना ते सेनगाव जाणारे रोडने एक इसम हा मोटार सायकलवर दारूची अवैधरित्या विक्रीसाठी घेऊन जात असलेबाबत खात्रीपूर्वक माहिती मिळाल्याने पथक तात्काळ सदर ठिकाणी पोहचून आरोपी सचिन प्रकाश जाधव, वय १९ वर्ष, रा. पार्डी पोहकर, ता. सेनगाव यास सरकळी फाटा येथे ताब्यात घेऊन त्याचे ताब्यातील देशीदारू संत्रा भिंगरी चे तीन बॉक्स किमती ११,५०० व एक मोटर सायकल असा एकूण ६१,५२० रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरुद्ध पो स्टे नर्सी ना गुरन ०३/२०२६ कलम ६५(अ)(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनी दिलीप मोरे, स्था. गु.शा. पथक यांनी केली आहे.

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले, जिजाऊ जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जानेवारी**

सांदीपनी पब्लिक स्कूल सुनील नगर तरोडा बुद्रुक नांदेड येथील शाळेत सावित्रीबाई फुले व जिजाऊ यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने शाळेत विविध कार्यक्रम संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली व त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात संस्कृती आरसुळे, प्रशस्ती प्रधान, रक्षिता बकवाड तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, समन्वय सल्लागार केदार शर्मा, अरविंद काळेवार यांनी सावित्रीबाई फुले व जिजाऊ यांच्याविषयी भाषणातून विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोगदंड यांनी केले. या कार्यक्रमाला उपस्थित शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# श्री संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ जानेवारी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.




याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये आज स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे कार्यक्रमाच्या अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पूजन करुन अभिवादन करण्यात आले. व श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील चिमुकल्यांनी सावीत्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर उत्स्फूर्त भाषणे केली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर देशमुख, सतिष भिसे, रविकुमार गायकवाड मा. ग्रामपंचायत सदस्य, सिमा फुटाणे प्रिन्सीपल श्री संस्कार इंग्लिश स्कूल, अश्विनी राऊत हे होते.

यावेळी सर्व शिक्षीका, प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाच्या अध्यक्ष यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या प्रिन्सीपल सौ सिमा फुटाणे, शिक्षीका सोनाली खंदारे मॅडम, सौ कोमल कापरे मॅडम, सौ .आरती आचार्य मॅडम, सौ. रेश्मा गायकवाड मॅडम, सौ. प्रियंका शिंदे मॅडम, सौ. वैष्णवी काळे मॅडम, प्रिती गाते मॅडम, सेविका सपाटे, संस्थेचे पदाधिकारी अमोल गलांडे, चालक अमजत पठाण, शाम घोडके, अशोक लोखंडे, आदित्य गलांडे, ज्ञानेश्वर पोपळघट, संचित गलांडे, संस्कार गलांडे यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रिन्सीपल सिमा फुटाणे मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन सौ आरती आचार्य मॅडम यांनी केले तर आभार वैष्णवी काळे मॅडम यांनी केले.

# आज नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा घेणार पदभार, पदभाराची जय्यत तयारी

## उपनगराध्यक्ष कोण होणार ?

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.४ जानेवारी**

अंबाजोगाई नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाचा पदभार सोमवारी नंदकिशोर मुंदडा घेणार आहेत. या पदभार सोहळ्यासाठी भाजप समर्थकांनी जय्यत तयारी सुरु केली असून नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांची भव्य मिरवणूक शहरातून काढण्यात येणार आहे. या मिरवणूकीत ठिकठिकाणी विजयी झालेल्या नगरसेवकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक प्रभागात स्वागताच्या तयारीसाठी कमिट्याही जाहीर करण्यात आल्या आहेत. एकंदरीत भाजप समर्थक या पदभार सोहळ्याला 'ग्रॅन्ड इव्हेंट' बनवणार असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.



अंबाजोगाई नगरपरिषदेची निवडणूक नुकतीच पार पडली असून अंबाजोगाईकरांनी नगराध्यक्षपदाचा कौल नंदकिशोर मुंदडांच्या पारड्यात टाकला आहे. त्यामुळे मुंदडांच्या कार्यकर्त्यांत मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून येत आहे. पदभार स्वीकारण्याअगोदर नगराध्यक्षांच्या दालनाची रंगरंगोटी आणि लिफ्टचीही सेवा सुरु करण्यात येत आहे. नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन समर्थक पदभार स्वीकारण्याची जोरदार तयारी करताना दिसून येत आहेत.

दरम्यान, नगरपरिषदेची सर्वसाधारण बैठकही येत्या काळात पार पडणार असून या बैठकीत उपनगराध्यक्ष तसेच स्वीकृत सदस्यांची निवड होणार आहे. नियमानुसार लोकविकास महाआघाडीच्या वाट्याला दोन, तर अंबाजोगाई परिवर्तन जनविकास आघाडीच्या वाट्याला एक स्वीकृत सदस्य मिळणार आहे. नगरपरिषदेत लोकविकास महाआघाडीचे स्पष्ट बहुमत असल्याने उपनगराध्यक्षपद त्यांच्या वाट्याला जाण्याची दाट शक्यता आहे. लोकविकास महाआघाडीचे नेतृत्व राजकिशोर मोदी करत असल्याने उपनगराध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार आणि स्वीकृत सदस्य म्हणून कोणाला संधी दिली जाणार, याकडे अंबाजोगाईकरांचे लक्ष लागले आहे. आगामी बैठकीत होणाऱ्या निर्णयांकडे सर्वांचेच लक्ष केंद्रित झाले आहे.

नवनिर्वाचित नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांच्या पदभाराची जशी चर्चा अंबाजोगाईत सुरु आहे, तशीच चर्चा उपनगराध्यक्ष पदाच्या बाबतीत सुरु आहे. उपनगराध्यक्षपदी लोकविकास महाआघाडीचाचं नगरसेवक विराजमान होईल आणि नगरपरिषदेच्या सत्तेची दुसरी चावी आपल्याकडेचं राहिल याची दक्षता आघाडीचे प्रमुख नेते घेत आहेत, अशी चर्चा राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे.

स्वीकृत सदस्यांत मोदी, लोमटे आघाडीवर : नगरपरिषदेत सत्तासंघर्ष

लोकविकास महाआघाडीला नगरपरिषदेत स्पष्ट बहुमत प्राप्त झाल्याने त्यांना दोन स्वीकृत नगरसेवक मिळणार आहेत. या स्वीकृत सदस्यांच्या निवडीत माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी आणि माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे यांची नावे आघाडीवर असल्याची माहिती समोर येत आहे. दोन्ही नेते अनुभवी आणि प्रभावी असल्याने त्यांच्या निवडीमुळे नगरपरिषदेत राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीमुळे महाआघाडीची ताकद अधिक वाढणार असून, सत्ताधारी व विरोधकांमध्ये जोरदार राजकीय हालचाली सुरू होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे येत्या काळात नगरपरिषदेत निर्णयप्रक्रिया, सत्ता संतुलन आणि राजकीय संघर्ष अधिक तीव्र स्वरूपात पाहायला मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# तालुकास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेत जि.प.प्रा.शा.आनंदगावचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२ जानेवारी**

केज येथे जि.प.बीड शिक्षण विभाग अंतर्गत झालेल्या तालुकास्तरीय वैयक्तिक क्रीडा प्रकारात जि.प.प्रा.शा.आनंदगांव ,केंद्र पैठण येथील विद्यार्थीनीं अनुष्का भोगजकर धावणे या क्रीडा प्रकारात तालुक्यातुन प्रथम,सांघिक क्रीडा प्रकारात लंगडी मुले लहान गटातुन याच शाळेतील विद्यार्थ्यांचा संघ केज तालुक्यातुन प्रथम आला आहे.



तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत समुह नृत्य स्पर्धेत लहान गट मुले जि.प.प्रा.शा.आनंदगांव तालुक्यातुन प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.या यशाबद्दल तालुक्याचे गट शिक्षण अधिकारी सुनिल केंद्रे, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती पठाण ,केंद्र प्रमुख अण्णासाहेब जाधव , केंद्रीय मुख्याध्यापक गोविंद मुळे मुख्याध्यापिका वृषाली आचार्य,सहशिक्षिका एम यु देशमुख,परदेशी एन,ए, आयवळे कुणाल, सरपंच अंजना गायकवाड ,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गायकवाड , माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष डॉ हनुमंत सौदागर , यांच्यासह ग्रा प सदस्य यासह

या शाळेतील विद्यार्थ्यांना जि.प.प्रा.शा.आनंदगावच्या मुख्याध्यापिका वृषाली आचार्य,मंगल देशमुख,निता परदेशी,कुणाल आयवळे यांचे मोलाचे मार्गदर्शन करून ग्रामीण भागातून शाळेला घवघवीत यश प्राप्त करून दिले याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# येडेश्वरी फाऊंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी व्यवसाय उभारणीस बळ

### लव्हुरीत 'राजवीर एंटरप्राईजेस'चे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२ जानेवारी**

खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली येडेश्वरी फाउंडेशन, केज यांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम प्रभावी ठरत असून, शेकडो महिला आज स्वतःचा व्यवसाय उभा करत आहेत. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या महिलांचे सक्षमीकरण व्हावे, त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्यात, या उद्दिष्टाने येडेश्वरी फाउंडेशनतर्फे महिला सक्षमीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या येडेश्वरी फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांना शिवणकाम, अरीवर्क कला, बेकरी प्रॉडक्ट्स, कॉम्प्युटर कोर्स आदी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. येडेश्वरी कार्यालयात सुरू असलेल्या या प्रशिक्षणातून महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून स्वतःचे व्यवसाय सुरू केले असून, अनेक कुटुंबांना याचा थेट लाभ होत आहे.



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ३ जानेवारी रोजी येडेश्वरी फाउंडेशनच्या सौजन्याने लव्हुरी येथे रूपालीताई शिनगारे यांच्या 'राजवीर एंटरप्राईजेस व जनरल स्टोअर्स' या व्यवसायाचे उद्घाटन येडेश्वरी फाउंडेशनच्या शितल लांडगे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश काशिनाथ पाटेकर यांनी केले तर प्रस्तावना सरस्वती शिनगारे यांनी मांडली. प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच विजयदादा चाळक, भाईदादा चाळक, छत्रभुज चाळक, दीपिका पाटेकर यांच्यासह गावातील मान्यवर व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

येडेश्वरी फाउंडेशनच्या सहकार्याने गोरगरीब महिलांचे व्यवसाय उभे राहत असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. महिलांच्या स्वावलंबनासाठी राबविण्यात येणारे हे प्रयत्न प्रेरणादायी ठरत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# बीड रा.स्व.संघ आयोजित बंधुता परिषद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ जानेवारी**

बीड, दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी धर्मप्रभा राष्टीय स्वयं संघ कार्यालय बीड येथे बंधुता परिषद २०२६ आयोजित केली होती.२ जानेवारी १९४० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भवानी शाखेला भेट दिली होती. त्या पार्श्वभूमीवर बंधुता परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी ज्येष्ठ आंबेडकरवादी विचारवंत माणिकराव वाघमारे व अँड.रणजीत वाघमारे यांनी मार्गदर्शन केले.




जेष्ठ आंबेडकरवादी विचारवंत श्री माणिकराव वाघमारे यांनी महापुरुषांना जातीच्या बंधनात अडकवून समाजात तेढ निर्माण केली जात आहे. अशा बंधुता परिषदांतून समाजात एकीचे वातावरण निर्माण होईल, २ जानेवारी १९४० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भवानी शाखेला भेट दिली होती. त्या पार्श्वभूमीवर बंधुता परिषद आयोजित करण्यात आली होती.

आम्ही डॉ. आंबेडकरांच्याच मार्गावर आम्ही चालणारे आहोत. डॉ. आंबेडकरांनी कराडच्या संघ शाखेला दिलेल्या भेटीचा 'जनता'मधील पुरावा समोर ठेवत आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, जर डॉ. आंबेडकरांनी संघाच्या शाखेला भेट दिली असेल, तर मीही त्यांच्या वाटेने का जाऊ नये? समतेच्या चळवळीत आम्ही काम करतो. आम्हाला समतेबरोबरच स्वातंत्र्य, लोकशाहीबरोबरच बंधुताही हवी आहे. संघ जर मोठ्या मनाने बंधुतेचा विचार घेऊन पुढे जात असेल तर मी त्यासोबत आहे.यावेळी अँड रणजित वाघमारे म्हणाले, डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समाजात न्याय आणि समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू, बौद्ध.शीख जैन समजा साठी हिंदू कोड बिल लागू केले हिंदुत्वाच्या माध्यमातूनही शोषणमुक्त समाज निर्माण झाला पाहिजे. त्यासाठी संघ कार्यरत असून, डॉ. आंबेडकरांनीही संघविरोधी भूमिका घेतली नव्हती. सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. शिवरायांच्या मार्गावर गेले पाहिजे ही संघाची भूमिका राहिली आहे.

समारोपीय भाषणात जिल्हा संघ कार्यवाहक श्री अतुलजी घोरड म्हणाले, राष्ट्रहित सर्वोतोपरी असे सांगणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी भारतातील सर्वच जाती मिटवून हिंदू एक व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. संघ स्थापनेपासूनच समरस हिंदू समाजासाठी कार्यरत आहे. प्रत्यक्ष व्यवहारातून संघ समाजात परिवर्तन करतो.संघाविषयी जाणीवपूर्वक गैरसमज पसरविले गेल्याचे सांगितले. ते म्हणाले, विचार स्वातंत्र्याचे गोडवे गाणाऱ्या मंडळींनी संघाच्या व्यासपीठावर जाण्याची बंदी घातली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लोकशाहीवर प्रचंड विश्वास होता. त्यांनी हिंसाचाराला कधीही प्रोत्साहन दिले नाही. दलित समाजानेही आता विचार करत एकात्म मानवतावादाच्या रस्त्याने जायला हवे, ज्यात अंत्योदयाचा विचार आहे. माणसाच्या मनातील असमानतेचा विचार काढण्यासाठी आपली सामाजिक समतेची लढाई ही रस्त्यावर नाही, तर लोकांच्या मनामध्ये लढायची आहे.

यानंतर अतुलजी घोरड यांनी जिज्ञासा समाधान केले.यावेळी श्री माणिकराव वाघमारे , अँड.रणजीत वाघमारे श्री अतुलजी घोरड , डॉ. सुभाष जोशी , अँड.रामजी बिरंगळ अँड. अरविंद पाटील, अँड सुहास सुलाखे अनुप्रिया मोरे.प्रा.रमेश लांडगे.अँड छाया कांबळे आदी बौद्ध समाजातील बहुसंख्य उपस्थित होते. परिषदेचे सूत्रसंचालन श्री. अँड.रामजी बिरंगळ यांनी केले व आभार मानले.

# नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे बालिका दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ जानेवारी**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिकादिन म्हणून साजरा करण्यात आला. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. सीमाताई जोशी. ड. संगीता ताई धसे ,गंगाधर देशमुख सर, श्रीमती.सुनंदा ताई कुलकर्णी, अर्चना ताई मोराळे आणि आरती ताई जोशी उपस्थित होते.



यावेळी प्रास्ताविकात मोराळे ताई यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी माहिती सांगितली. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी ओवी सादर केली. यामध्ये सर्वस्वी फसले, आराध्या राठोड, अश्विनी नाईकवाडे ,साक्षी नाईकवाडे आणि मार्गदर्शक म्हणून सोनसाळे ताई होत्या.

सावित्रीबाईंच्या माहितीची एक कलिका तयार केली होती या कलीकेसाठी संजना ताई व इयत्ता पाचवी चे सर्व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली. त्यानंतर घोषवाक्यांचा सादरीकरण झालं. विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. त्यामध्ये वैष्णवी कुलकर्णी, साची पवार, कादंबरी कुलकर्णी, सृष्टी राऊत, राजवी जाधव, प्रांजल यादव, ओवी घोलप , आर्या नवले, वेदांत बाराहाते, अरहा मोहोळकर, आदिती देवणे, विराज देशमुख , अर्जित शिंदे. ,फुले सावित्री नसत्या तर या गीतावर नृत्य सादर करण्यात आले यामध्ये दूर्वा परजणे, साची पवार, अनन्या गायकवाड, स्वरांजली तकिक , आरुष्या बारस्कर श्राव्या औसेकर, परी कांबळे, जानवी तांबारे, संयोगिता धांडे ,श्रेयसि शिरसट अंशिका शेवाळे, वैष्णवी धायगुडे इत्यादी विद्यार्थ्यांचा सहभाग असून स्नेहलताई गोसावी व अनिताताई कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. यानंतर मी सावित्रीबाई फुले बोलतेय यांच्या जीवनावर एकपात्री नाटिका सौ.सुरवसे ताई यांनी सादर केली.सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित असलेल्या पुस्तकांची यादी जयश्री ताई देशपांडे यांनी सादर केली. यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या ड.धसे ताई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी अध्यक्ष समारोप डॉ. सीमाताई जोशी यांनी केला. या कार्यक्रमाचा शेवट नमो मातृभूमी या प्रार्थनेने झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल ताई कुलकर्णी, प्रस्ताविक मोराळे ताई, आभार प्रदर्शन स्वातीताई देशपांडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.सीमाताई जोशी, ड. अर्चनाताई तुंगार, गंगाधर देशमुख सर, सुनंदाताई कुलकर्णी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

तसेच सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# वैशाली आकुसकर (बुरांडे)आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोाई दि.४ जानेवारी**

शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची येथे कार्यरत आसलेल्या शिक्षिका वैशाली काशिनाथराव आकुसकर ( बुरांडे ) यांना जिल्हा परिषद बीडचा आदर्श शिक्षक पुरस्कार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला आहे.शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची येथे कार्यरत आसलेल्या शिक्षिका श्रीमती वैशाली काशिनाथराव आकुसकर( बुरांडे) या पुर्वी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पळसखेडा येथे मुख्यध्यापक म्हणून कार्यरत आसताना शाळेला आएसओ मानांकन मिळाला होता. तर शहरातील कन्या शाळेचे व विद्याध्यार्थ्यांने नाव उज्जवल करण्यात मोलाचा वाटा होता.सध्या कार्यरत आसलेल्या शाळेत शाळेत भंगार,प्लास्टिक वेचणारे बाल कामगार म्हणून काम करणारे, वीटभट्टी कामगारांची मुले, ऊस तोडणी कामगारांच्या शाळा बाह्य मुलांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात सर्वाधिक विद्यार्थी प्रवेश घेतल्याने गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांचा सन्मान केला होता. गोरगरीब विद्यार्थ्यांना सढळ हाताने व निस्वार्थीपणे ते शैक्षणिक साहित्याची व आर्थीक मदत करत आसतात.शाळेत सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून विविध शालेय व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, ऍस्ट्रॉनॉमिक क्लब प्रमुख म्हणून काम करत आहेत. अपूर्व विज्ञान मिळाव्याचे आयोजन,शाळेची बँक, शाळेतील विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी मदत प्रशिक्षणातज्ञ मार्गदर्शक म्हणून काम करत आहेत. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या वैशाली अकुसकर या शहरातील आदर्श शिक्षक म्हणून परिचित आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्यात शिस्त, संस्कार आणि सामाजिक जाणिव निर्माण करण्यावर विशेष भर देतात. त्यांची अध्यापन पद्धत ही विद्यार्थीप्रिय, समजण्यास सोपी व परिणामकारक असून त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी यशाची शिखरे गाठली आहेत.विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी दिलेले योगदान, त्यांच्या अथक परिश्रम आहे.त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असून शाळेच्या नावलौकिकात भर घालत आहेत. शैक्षणिक,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावून तसेच निपुण महाराष्ट्र अंतर्गत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे.



# महात्मा फुले चौक येथे रक्तदान शिबीर

## ४३ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.४ जानेवारी**

महात्मा फुले चौक फुलेपिंपळगाव रोड केसापुरी कॅम्प येथे ११ वर्षाची परंपरपरा राखत प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी राजमाता जिजाऊ,व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले याच्या संयुक्त जन्मोत्सवा निमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन जिजाऊ, सावित्री जन्मोत्सव समिती व जानसा सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्येमाने करण्यात आले होते हा उपक्रम दि.३ जानेवारी रोजी सलग ११ वर्षापासुन फुलेपिंपळगाव येथे राबवल्या जात आहे या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.००वा राजमाता जिजाऊ व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतीमांचे पुजन करुन करण्यात आले रक्तदान शिबीराचे उदघाटन बहुजन देते ज्ञानेश्वर नाना मेंडके यांनी केले या प्रसंगी डॉ भगवान सरवदे,बहुजन समाज पार्टी चे ॲड.अमोल डोंगरे,विवेक दादा पोटभरे,शरद कचरे,माजी सरपंच दशरथ उंबरे,माजी सरपंच अभिमन्यू साळवे ,सेवा सहकारी सोसायटी संचालक मुस्तकिम सय्यद,माजी सरपंच, रामेश्वर कोरडे,सदधम्म सेवासंघाचे सोपान उजगरे,सेवा सहकारी सोसायटी केसापुरीचे माजी सरपंच विलास साळवे,, एकता परिषद चे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे, साईंभक्ती ट्रव्हल्स चे मालक विलास सामाले, माजलगाव पिपल्स अर्बन चे चेअरमन निशात साळवे,सौभाग्य मंगलकार्यालयाचे मालक डॉ विकास कोरडे,नाना उंबरे,बहुजन समाज पार्टी चे हरिभाऊ साळवे , भारतीय बौद्ध महासभेचे ,दयानंद साळवे,इंगवले सर ,दत्तात्रय खामकर, बौद्धाचार्य विजय साळवे, दत्तात्रय प्रधान,अक्षय त्रिभुवन, गेनेश ट्रव्हल्स चे मालक भैय्या प्रधान, सुभाष साळवे,ॲड चैतन्य कोरडे, शंकर गावडे,दत्ता आबुज सह रक्तदाते व गावकरी उपस्तीत होते,या शिबीरात ४३ रक्तदात्यांनी रक्तदान केले या जानसा सेवाभावी संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ भागवत साळवे यांनी जिजाऊ, सावित्री जन्मोत्सव समित व जानसा सेवाभावी संस्थेच्या माध्यमातुन सर्व सामान्य रुग्णा ची गरज लक्षात घेऊन गेल्या ११वर्षा पासुन हा उपक्रम सातत्य ठेऊन राबवण्यात येतो शिबीरा साठी माजलगाव रक्तपेढीच्या कर्मचारी यांनी सेवा दिली ,हे शिबीर यशस्वी करण्यासाठी ,सुरज खळगे, अशोक साळवे, विठल कुरे,बाळकृ कोरडे,मोहन कोरडे,संभाजी उंबरे,अर्जुन फुलगे, सतिष उंबरे,,विलास उंबरे, अभिषेक कोरडे, सचिन ससाने,, निवृत्ती नवघरे, सोमनाथ कोरडे,यांनी परिश्रम घेतले या शिबीरा साठी ज्या रक्तदात्यांनी रक्तदान केले व या शिबीस सेवा पुरवणारे माजलगाव रक्तपेढीच्या कर्मचारी यांचे आयोजकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com


पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

## पुण्यश्लोक अहिल्यामाता म्हणजेच... साक्षात भारतमाता...!

# बारव संवर्धनाच्या कामाचा शुभारंभ

## सोमवार, दि. 5 जानेवारी 2026 रोजी सकाळी 9.30 मि.

## स्थळ : गणेशवाडी, ता. गंगापूर, जि. छ. संभाजीनगर.

लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी वर्षानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी ने बांधलेल्या ऐतिहासिक बारव पुनरुज्जीवन (जीर्णोद्धार)

● खालील 5 ठिकाणी बारव पुनरुज्जीवन (जीर्णोद्धार) तात्काळ प्रत्यक्ष कामास सुरुवात ●

बाबरगाव : रू. 29,02,938/-
दहेगाव : रू. 38,36,775/-
कायगाव : रू. 59,53,058/-
वेरूळ : रू. 27,95,990/-
गणेशवाडी : रू. 27,23 ,202/-



- अध्यक्ष -



श्रीमंत मुकुंदसिंह नानासाहेब राजे होळकर
राजघराणे, इंदौर

- उद्घाटक -



प.पू. भास्करगिरीजी महाराज
श्रीक्षेत्र, देवगड



ह.भ.प रमेश महाराज वसेकर
(श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे 18 वे वंशज श्रीक्षेत्र अरण)

- प्रमुख उपस्थिती -



श्री. रामभाऊ लांडे
इतिहास संशोधक, वक्ते
होळकर राजघराणे, इंदौर




### गंगापूर-खुलताबाद तालुक्यातील बारवांचे प्रत्यक्ष हाती घेतलेले काम

| अ. क्र. | स्मारकाचे नांव | ठिकाण | तालुका | जिल्हा | प्रशासकीय मान्यतेकरिता ढोबळ अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | बाबरगांव येथील बारव, बाबरगांव | बाबरगांव | गंगापूर | छ. संभाजीनगर | 23,95,216/- |
| 2. | दहेगांव येथील बारव, दहेगांव | दहेगांव | गंगापूर | छ. संभाजीनगर | 27,45,978/- |
| 3. | कायगांव रोड (राज्य महामार्ग 39) बारव, कायगांव | कायगांव | गंगापूर | छ. संभाजीनगर | 59,47,360/- |
| 4. | वेरुळ येथील बारव, वेरुळ | वेरुळ | खुलताबाद | छ. संभाजीनगर | 27,04,868/- |
| 5. | जोड गणपती बारव, गणेशवाडी | गणेशवाडी | गंगापूर | छ. संभाजीनगर | 30,34,591/- |
| | **खालील बारवांचे पुनरुज्जीवन परवानगीसाठी पुरातत्व विभागाकडे सादर** | | | | |
| 6. | शेंदुरवाडा येथील बारव, शेंदुरवाडा | शेंदुरवाडा | गंगापूर | छ. भाजीनगर | 13,66,915/- |
| 7. | भेंडाळा येथील बारव, भेंडाळा | भेंडाळा | गंगापूर | छ. संभाजीनगर | 20,62,158/- |
| 8. | तुर्काबाद येथील बारव, तुर्काबाद | तुर्काबाद | गंगापूर | छ. संभाजीनगर | 17,76,305/- |
| 9. | लखमापुर येथील बारव, लखमापुर | लखमापुर | गंगापूर | छ. संभाजीनगर | 20,45,089/- |
| 10. | गणपती बारव, जामगांव | जामगांव | गंगापूर | छ. संभाजीनगर | 24,67,650/- |
| 11. | मांडवा येथील बारव, मांडवा | मांडवा | गंगापूर | छ. संभाजीनगर | 23,11,322/- |
| | | | | **एकुण रक्कम रुपये** | **2,88,57,452/-** |

- आयोजक -



**प्रशांत बन्सीलाल बंब**
आमदार, गंगापूर-खुलताबाद (रत्नपूर)

**अहिल्यामातेचा वारसा भावी पिढींनाही प्रेरणा देणार...**

**सर्व भाविकांनी उपस्थित राहावे.**

Design by : Maya Innovations : 9890504030